वर्षाची आगाऊ रु० ५ टांकहशील ॥१२
सहामाही " ३ " " ॥८
साल अखेर " ७ " " १॥८
किरकोळ अंकास................... ॥४

RS.
Per annum in advance 5 Postage 12 as
Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
Single copy................................ 4 as

नोटिशी बदल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ॥१॥६
दुसरे खेपेस .......॥१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements.
Below 10 lines...2rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

## THE BERAR SAMACHAR.

VOLXX AKOLA MONDAY 6 DECEMBER 1886 NO 47

पुस्तक २० अकोला सोमवार तारीख ६ माहे दिसेंबर सन १८८६ इ० अंक ४७

## वेदांतग्रंथ.

संस्कृत टीका व मराठी अर्थ व समजुतीच्या टिपा ह्यासहीत,
रा० रा० व्यंकटराव रामचंद्र ह्यांनीं तयार केलेले. किं. ट. ख.

इशोपनिषत् .... ..........॥८—॥१
केनोपनिषत् ................॥८—॥१
काठकोपनिषत्,(अध्याय१) ...॥१२-॥१
काठकोपनिषत्,(अध्याय२)....॥१२-॥१
तैत्तिरीयोपनिषत्,[भृगुवल्ली] ....॥८ —॥१

तैत्तिरीयोपनिषत् ,(ब्रह्मानंदवल्ली)तयार होत आहे. छांदोग्योपनिषत् , ( प्रपाठक ६ ) छापीत आहों. योगसुत्रें, [ समाधिपाद ] छापीत आहों.

हे ग्रंथ ज्ञानचक्षु छापखान्यांत फक्त ब्राम्हणांना विकत मिळतील.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक.

## नोटिस

चिमाई मर्द गंगु वरठी रहाणार मौजे अंजनी खुर्द तालुके मेहेकर जिल्हा बुलठाणें इजला खालीं सह्या करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा गंगु वरठी हा आमचा अनुक्रमें सख्खा भाऊ व चुलता होता त्यांनीं व आम्ही मिळून साठ रुपयास मौजे वाल्हूर प्रगणें लोणार येथील शेत सर्वेनंबर ३ एकर ३४॥१० आकार ३० चे खरेदी केले होते. याची वहिती ही आजपर्यंत आम्ही दोघे व तुझा नवरा असे मिळून करीत आलों व पुढें ही करूं. परंतु ७।८ महिने झाले तुझा नवरा गंगु हा मयत झाला व या नंबराचें खातें तुझें नांवें झालें. खातें होण्याचे वेळीं पाटील पांड्याचा रिपोर्ट नंबर १ तारीख १४-४-८६ इ०चा कीं आम्ही दोघे ॥५॥४ प्रमाणें ॥१०॥८ चे तुझा नवरा गंगु हा ॥५॥४ चा आहे. तुझी इच्छा येथें रहाण्याची नसून सावरखेड येथें आदले घरचे मुलाकडे जाण्याची आहे असें कळतें. तसेंच तूं विनाकारण कर्ज काढून रुपये सावरखेड्यास पाठविते आणि म्हणतेस कीं, कर्जाऐवजी नंबर सावकारास देईन हें तुझें करणें गैरशिस्त असुन तूं फक्त ॥५॥४ हिशाची मालकीण आहेस तो तुझा हिसा तूं नवरा वगैरे न केल्यासच राहणार आहे. नाहीं पेक्षां आम्हीच वारस आहोत. तसेंच समाईक पैकीं म्हणजे तिघाचे मालकी चे तुजजवळ सोन्याचे देव २ वजन मासे ६ किं. ११ रु. व गेठा चांदीचा व० तो० १६ किं० रुपये १६ एकूण २७ रुपये याचा माल तूं विकलास त्यापैकीं आमचे दोघाचे हिशाचे रुपये १८ व नंबरांत आमचे एकएकाचे ॥५ आणे ॥४ पै हिशाप्रमाणें ॥१० आणे ॥८ पै चे हिसे नोंदून ही नोटीस पावल्या तारखे पासून सहा दिवसांचे आंत द्यावेत या प्रमाणें वरील मुदतींत न झाल्यास फिर्यादीचा व नोटीसीचा खर्च तुला द्यावा लागेल हे खुप समजावें कळावें ता० १ दिसेंबर सन १८८६ इसवी.

(सह्या)१कमळ व० सीवना वाटी नि० हातची रेघ १ मारुती व० विटोबा व० नी०हा० रे०
दस्तुर रामचंद्र नारायण कुळकर्णी मौजे अंजनी खुर्द.

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष शुद्ध १० शके १८०८

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

इतक्या सर्व अडचणी दुर करूनही आंग्लोव्हरन्याक्युलर स्कुलांत चित्रकलेची सुरवात केली तथापि फळ काय? हायस्कुलचा सर्व अभ्यासक्रम संपे पर्यंत ड्रॉइंग कडील सेकंड ग्रेडची परीक्षा पास होण्या इतका अभ्यास होतच नाहीं. येऊन जाऊन परीक्षा अखेर काय ती फर्स्ट ग्रेडचीच होणार. मग ती परीक्षा हल्लीं हायस्कुलांत शिक्षण सुरूं केल्यानें ही देतां येते. मग बाकीच्या हायस्कुलांतील ड्राइंग मास्तरांवर आणखी कामाचा बोजा उगाच कां लादावा. हल्लींचे काम त्यांना थोडें आहे असें नाहीं आमच्या बंधूंनीं उमरावती हायस्कुलच्या ड्राइंग मास्तरानें आठवड्याचे ३ तास जें काम दिलें आहे तें चुकीचें आहे असें शोधांतीं आम्हांस कळतें. त्याचें वास्तविक काम आठवड्याचें अधिक तास असून ड्राइंग आणि कापी रायटिंग याचें काम करून त्यांना शिवाय आफिसचें काम करावें लागत आहे तेवढें बस आहे. त्यांना दुसरे कडील ड्राइंगचें काम आणखी दिलें असतां त्यांच्या जवळून आफिसचे काम काढावें लागणार; व तसें केलें असतां हायस्कुलांतील दुसऱ्या कोणत्या तरी मास्तरांच्या गळ्यात तें बांधू। इतर विषयांचें यांचें काम कमी करावें लागणार. मिळून नमळचच एकच. शिवाय आंग्लोव्हरन्याक्युलर स्कुलांतच हें शिक्षण सुरू केलें नाहीं म्हणून आपण इतर प्रांताच्या मागे राहिलो असें मुळींच नाहीं. कारण मुंबई इलाखाच घ्या. या इलाख्यांत विद्याखातें पुष्कळ सुधारणेला जाऊन पोंचले आहे व त्यांत धंदे आणि कला यांच्या शिक्षणाचा ही बराच प्रसार झाला आहे तथापि त्या इलाख्यांत जीं ऑग्लोव्हरन्याक्युलर स्कुल्स आहेत त्यां सर्वांत तरी अझून ड्राइंगचे वर्ग कोठें सुरूं झाले आहेत. फक्त प्रत्येक हायस्कुलांतच आहेत, व त्यांतही फर्स्टग्रेड परीक्षेच्या वर अभ्यास होत नाहीं. मग आमचे इकडेच घाई कां? आतां मुंबई इलाख्यांतील पुष्कळ हायस्कुलांतच ऑग्लोव्हरन्याक्युलर शाळांतील शिक्षण मिळतें व तेणेंकरून हायस्कुल साठीं दिलेल्या ड्राइंग क्लासाचा त्या वर्गांनाही उपयोग होतो हें खरें परंतु एक मुंबई शहर खेरीज करून इतर ठिकाणीं जीं ऑग्लोव्हरन्याक्युलर स्कुल्स आहेत त्यांत हे क्लास अद्याप सुरूं झाले नाहींत. ऑग्लोव्हरन्याक्युलर स्कुलांच्या इयत्ता हायस्कुलांतच जर नसत्या तर त्यांच्या साठीं स्वतंत्र ड्राइंग मास्तर त्या इलाख्यांत दिले असते कीं काय याचा आम्हाला संशयच आहे.

यासाठीं आमचे जवळ जर साधनें नाहींत तर सध्या स्वस्थ बसावें हें बरें असें आम्हांस वाटतें. आपल्या देशाची उन्नति होण्याकरितां अगोदर आपल्या लोकांना धंदे व कला यांचें शिक्षण जेवढें देववेल तेवढें दिलें पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे व ड्राइंग ही कला त्या सर्व शिक्षणाला आधारभूतच असल्या कारणानें या कलेचें ज्ञान तर सर्वांना अवश्य पाहिजे खरें तथापि तें देण्यासारखे प्रवीण शिक्षक आपल्याला सध्यां जर मिळणें कठीण आहे तर उगाच त्या कलेचें अनभिज्ञ व नवशिक्या शिक्षकांजवळून आरंभ करण्यांत काय अर्थ आहे; यापेक्षां हल्लीं हायस्कुलांत हें शिक्षण देत आहेत तेंच निकडून होईल तितक्या उत्तम रीतीनें दिलें जाईल अशी तजवीज करावी हें अधिक फायदेशीर होईल.

हायस्कुलांत ड्राइंगचें जें शिक्षण हल्लीं दिलें जात आहे त्याच्या ठरीव इयत्ता कराव्यात असें जें आमच्या बंधूचें म्हणणें आहे तें रास्त आहे. असें केल्यानें प्रत्येक वर्गाचा या कलेचा अभ्यास शिस्तवार होत जाईल. तथापि तसें करण्यापूर्वी पुष्कळ गोष्टींचा विचार केला पाहिजे. एकतर ड्रॉइंग हा विषय हल्लीं आहे त्यापेक्षां हायस्कुलांतील विद्यार्थ्यांना अधिक आ इ कतचा केला पाहिजे हल्लीं ड्रॉइंग संबंधानें मुलांची फार अनास्था दिसून येते. कारण त्यांना माहित असतें कीं यद्यपि आपण ड्रॉइंग या विषयांत नापास झालो तथापि निदान पी. जी. ( ग्रेस मार्कांनीं पास ) होऊन वरच्या क्लासांत जाऊं. असा बहुतेकांचा समज असल्या कारणानें व हायस्कुलांत या पी. जी. चे ही वंड फार माजल्या कारणानें मुलें इतर विषयाकडे मात्र आपल्या शक्त्यनुरूप लक्ष देतात. ड्रॉइंगकडे मुळींच पहात नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें बिचाऱ्या डॉइंग मास्तरांचें श्रम व्यर्थ जाऊन सरकारच्या पैशाचें ही चांगलेंसें चीज होत नाहीं. एवढ्याकरितां हायस्कुलांतील क्लासांतून इतर विषय ज्याप्रमाणें अगत्यानें शिकावे लागतात किंवा कसरतीची परीक्षा पास झाल्याशिवाय ज्याप्रमाणें ट्रेनिंग कालेजच्या विद्यार्थ्यांना पास केलें जात नाहीं. त्याप्रमाणेंच ड्रॉइंग या विषयाची आवश्यकता सुरूं करावीं; म्हणजे ड्रॉइंग मास्तर नेमल्याचा कांहीं तरी उपयोग होऊं लागेल. नाहींतर ही कला शिकणें प्रत्येक विद्यार्थ्याच्या खुशविर ठेऊन मुंबई इलाख्यांतील कित्येक कालेजें आणि हायस्कुलें यांना जोडलेल्या ड्रॉइंग क्लासाप्रमाणें निराळा क्लास काढून त्यांत फक्त ज्यांची इच्छा ड्रॉइंग शिकण्याचा असेल त्यांसच शिकवीत जावें. हल्लींच्या धड इकडे नाहीं व धड तिकडे नाहीं अशा व्यवस्थेपासून खरा उपयोग कांहीं होत नाहीं व होणारही नाहीं. या शिवाय आमची आणखी एक अशी सूचना आहे कीं ही कला आपल्या प्रांतांत नवीनच सुरूं केली आहे तेव्हां ही शिकण्या विषयीं विद्यार्थ्यांस कांहीं तरी लालुच दाखविली पाहिजे. हल्लीं आपल्या हायस्कुलांत विद्यार्थी शिकतात परंतु ते सर्व केवळ बळजोरीनें चाललेलें असतें- त्यांच्याजवळ ड्रॉइंगला लागणारीं हत्यारें वगैरे कांहींच नसतें बरोबरच आहे. मुळीं शिकण्याची उत्कंठाच नाहीं मग हत्यारें घेतो काण. तेव्हा प्रथम कांहीं दिवस सरकारनें आपल्या पदरचे टीस्क्वेअर सेट स्केअर वगैरे सामान विद्यार्थ्यांस वापरावयास द्यावें. म्हणजे तरी त्यांनां कांहीं अभिरुची लागेल. प्रत्येक हायस्कुलाला सुमारें २० पर्यंत या हत्यारांचे जोड आणिले म्हणजे पुरे आहेत व यास खर्चही फार लागेल असें नाहीं. कपांसाला मात्र किंमत फार पडेल; बाकी बोर्ड, स्केअर्स, मेझर्स वगैरे सामान एतद्देशीय सुतारां जवळून करून घेतले तरी चालण्याजोगें आहे. अशा प्रकारची व्यवस्था ड्रॉइंग सारख्या कलांचीं विद्यालयें या देशांत नवीन स्थापन झालीं तेव्हां तेथेंही प्रथम कांहीं वर्षे ठेविलेली असे, व मग विद्यार्थ्यांची संख्या वाढत चालल्यावर ती बंद केली आहे. या प्रमाणें कांहीं २-४ वर्षे सरकारांतून साधनांचा पुरवठा झाला असतां विद्यार्थ्यांना ड्राइंग शिकण्याची गोडी निदान हल्लींपेक्षां तरी अधिक लागेल असें आम्हांस वाटतें. हा पुरवठा करण्याकरितां प्रथम जो खर्च लागेल तो ५० रुपयांवर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं व त्याचा दरवर्षी हायस्कुलला कांटिंनजंटसाठीं जी नेमणूक दिलेली असते त्यांतून भागर

फिलॉसाफीकल आपारेटस म्हणजे यांत्रिक वगैरे प्रयोग करून दाखविण्या करितां जीं यंत्रें व सामान लागतें त्याला दिलेल्या रकमेंतून केल्यास फारशी हरकत येईल असें आम्हांस वाटत नाहीं. तेव्हां या सुचनेचा ही आमच्या खात्यांतील अधिकाऱ्यांनीं विचार करावा अशी आमची त्यास विनंती आहे.

## प्रवास

प्रवास करण्यापासून अनेक फायदे आहेत. आपलें नेहमीं राहण्याचें ठिकाण सोडून इतर ठिकाणीं गेलें असतां कायकाय अडचणी येतात व त्या दूर करण्यासाठीं कायकाय युक्त्या योजाव्या लागतात या विषयीं प्रत्येक मनुष्यानें थोडाबहुत प्रवास केला म्हणजे साहाजिक कळून येतें अनेक ठिकाणीं गेल्यानें व तेथील वस्तु पाहिल्यानें मनुष्याचें शाहाणपण वाढतें. कोणत्या वस्तु कोणत्या ठिकाणीं आहेत आपल्या राहत्या ठिकाणाहून इतर ठिकाणीं कोणत्या वस्तु भिन्न आहेत त्यांतून चांगल्या वाईट कोणकोणत्या आहेत वगैरे गोष्टी सहज रीत्या प्रवासानें कळतात. मनुष्यास शाहाणपण येण्याचे जे मार्ग आहेत त्यापैकीं प्रवास करणें हा एक पुरातन काळापासून गणला गेला आहे. आतां प्रवास करण्यास कांहीं गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत त्यापैकीं अतिशय महत्त्वाची म्हटली म्हणजे ज्या देशांत प्रवास करण्याचा त्या देशांत प्रवाशाचे जिवास भिती नसावी व त्यांचें सामान वगैरे लुटलें जाण्याची भिती नसावी. ज्या देशांत या दोन गोष्टीं आहेत त्या देशांत जाण्याची बुद्धि व्हावी हें उघडच आहे. त्यानंतर तेथील रस्ते व प्रवास करण्याची साधनें म्हणजे गाड्या वगैरे ही असलीं पाहिजेत. अर्थांतच ज्या देशांत प्रवाशाचे जिवास धोका नाहीं व रस्ते वगैरे ही चांगले आहेत तथें सुधारणा ही बरीच असणार आहे व तसल्या ठिकाणीं प्रवास करून पाहण्या जोग्या गोष्टी कांहीं तरी असल्याच पाहिजेत. इतकी सर्व सामग्री असली म्हणजे देशांतरी प्रवास करणें फार सोपें व मनोवेधक होतें.

प्रवास करण्यापासून जो एक मोठा फायदा होतो त्यापैकीं एका देशांतील लोकाचे दुसऱ्या देशांतील लोकांशीं दळणवळण वाढतें हा होय. आपल्या रितीभाती कशा आहेत त्यांत सुधारणा करण्याजोग्या किती आहेत, लोकांच्या नव्या रितीभाती अनुकरण करण्याजोग्या कोणत्या आहेत हें प्रवास केल्यामुळें सहज कळून येतें. एके ठिकाणीं राहण्यापासून मनुष्याचे विचार एका विशेष कल्पाचे बनतात व त्यामुळें मनाचा मोठेपणा वाढत नाहीं मन जसेंच्या तसेंच संकुचित राहत एखाद्या गोष्टीचे संबंधानें जे मत ठाम होऊन जातें तें कांहीं केल्यानें बदलत नाहीं व असें होण्याचें कारण म्हटलें म्हणजे आपले मताचा खरेपणा किंवा खोटेपणा कळून येण्यास दुसरीं मतें तुलना करण्यास नसतात. दुसऱ्या मतांशीं आपलीं मतें ताडून पाहिलीं म्हणजे आपल्या मतांत चुक काय आहे हें तत्काळ न कळून आल्यास निदान कांहीं काळ गेल्यावर तरी कळून येते व त्यामुळें मनाची चांगली सुधारणा होते. तसेंच दळणवळण वाढल्यानें राष्ट्रांचे एकमेकाविषयीं जे वाईट ग्रह असतात ते नाहींसे होत होत जातात व त्यामुळे राष्ट्रांचा एकमेकांशी स्नेहभाव वृद्धिंगत होऊन भांडणांचें बीज नाहींसें होतें. यास उत्तम उदाहरण फ्रान्स व इंग्लंड या दोन देशांचें. इंग्लंड व फ्रान्स या देशांतील लोक एकमेकांस वैरभावानें पाहात असत त्यामुळें एकमेकांनीं एकमेकांस शिव्या देण्या लोकडे त्यांचें बिलकुल दळणवळण नसे व यामुळेंच एकमेकांच्या खऱ्या गुणावगुणाची परीक्षा तर दूरच राहिली परंतु वैरभाव दिवसेंदिवस दुणावत चालला. खरोखर दोन्ही देशांत उत्तम प्रेमभाव असावयाचा तो न राहतां उलटें वैमनस्य मात्र वाढत चाललें. परंतु कांहीं दिवसांनीं इंग्लंडांतील लोक फ्रान्स देशांत जाऊं लागले त्यामुळें थोड्याच दिवसांत एकमेकांचे खरे गुण व दुगुण एकदम कळून आले व दोन्ही देशांत सुधारणा झाली व प्रेमभाव अधिक वाढूं लागला. शेवटीं असें झालें कीं इंग्लंड देशांतील संभावित म्हणविणाऱ्या गृहस्थांचीं मुलें फ्रान्स देशांत व इतर ठिकाणीं प्रवास करण्यास जाऊं लागलीं. याप्रमाणें दळणवळण वाढल्यामुळें व्यापारही बराच वाढला व दोन्ही देशांचा एकमेकांस अधिकाधिक उपयोग होऊं लागला. यावरून उघड आहे कीं प्रवास केल्यानें जें दळणवळण वाढतें त्यामुळें देशांतील व्यापारही वाढतो दुसऱ्या देशांत गरज कोणकोणत्या गोष्टींची आहे हें साहाजिक प्रवासानें कळून आलें म्हणजे व्यापार अर्थांतच वाढतो.

दुसरा फायदा म्हटला म्हणजे दुसऱ्या देशांतील पाहण्या सारखीं स्थळें व जिनसा नजरेस पडतात. कित्येक ठिकाणीं पाहाण्याजोगे सृष्टींतील सुंदर सुंदर देखावे असतात; कित्येक ठिकाणी मोठे मोठे धबधबे असतात; त्याप्रमाणेंच मोठमोठ्या नद्या मोठाले पर्वत व अरण्यें ही पाहिल्यानें सृष्ट पदार्थांविषयीं मनावर एक चमत्कारिक परिणाम होतो व त्यायोगानें मनाची विशदता वाढते. पुष्कळ ठिकाणीं लढाया झालेल्या असल्यामुळें त्यांची प्रसिद्धि असते, कित्येक ठिकाणीं देवस्थाने असतात, कित्येक ठिकाणीं कित्येक स्थानें व क्षेत्रें कांहीं साधुपुरुषांच्या संगतीनें पवित्र झालेलीं असतात यासारख्या गोष्टी पाहाणें मोठ्या मौजेचें आहे. कूपमंडुकाप्रमाणें आपला प्रदेश म्हणजे काय तें सर्व जग असें मानून ज्याप्रमाणें जन्मास आले तसे कोरेचे कोरे जाणारे अनेक दृष्टांत पडतात अशा लोकांचा जन्म वास्तविक व्यर्थ आहे असें म्हटलें असता चालेल. दुसऱ्या देशांत प्रवास केल्या पासून नवीन नवीन शोध ही पुष्कळ वेळा लागले आहेत. हंबोल्ट म्हणून एक प्रसिद्ध प्रवास करणार होऊन गेला त्यानें पुष्कळ देश फिरून आपले प्रवासाचा अनुभव लिहून ठेविला आहे त्यानें नव्या गोष्टी पाहल्या यावरून नवे नवे शोध करण्याची पुष्कळ सिद्धता झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. देशोदेशीं अमुक प्रकारची झाडें आहेत, अमुक प्रकारचे पक्षी वजनावरें आहेत असें कळल्यानें सृष्टीचा एकदर काटिक्रम कोणत्या तत्त्वेवर आहे व सृष्टपदार्थांची एकंदर मालिका कोणत्या पद्धतीस अनुसरून आहे याविषयीं अनुमान करण्यास पुष्कळ वाट सांपडली. तत्त्ववेत्यांनीं या माहितीवरून पुष्कळ प्रमाणें बसविलीं व सिद्धांत ही केले. याप्रमाणें हंबोल्ट याचे प्रवासाचा फार मोठा उपयोग झाला. म्हणजे शास्त्रीय विषयांचे संबंधानें चांगला उपयोग झाला. पुढें चालेल.

# The Berar Samachar

MONDAY 6 DECEMBER 1886

## A PROPOSAL FOR A SARVA JANIK SABHA FOR BERAR.

We understand that a move is being made for a Sarvajanik Sabha or an Association represeenting public opinion in Berar. Of course any such idea can arise only at Amraoti-our present centre of light in Berar; and it has at present occupied the minds of some who are considered to be the leaders of public opinion in that city The necessity of an institution has been felt and before practically settling the question and bringing an Association of the kind mentioned into existence, the subject has been selected as one to be spoken about, perhaps discussed at the Elocution Gathering. It is always a good policy to gauge public opinion with regard to a subject by ventilating it in meetings like the ElocutionGathering as also in the public press; and we think that a consideration of the necessity of the proposed Association by us will not be out of plan at the present moment.

The actual necessity of a Sabha to represent public opinion in Berar is beyond doubt. There are so many grievances in Berar which are connected with the administration of the various departments and which the public are concerned in complaining about and getting redressed, that the existence of an institution like the proposed Sabha can be easily justified. Out of the many advantages which we enjoy under British rule, if there is one more important than another, it is the right to lay freely our grievances before Government. Further it will also be clear that whenever any thing is felt to be a public grievance any individual effort to redress it must necessarily be productive o less good than a combined one. Any representation made to Government by any influential body representing as a matter of fact enlightened public opinion must naturally carry with it weight and conviction. Granting then that there are grievances which can appropriately be termed public and there must always be such grievances, and that combined efforts to redress them are more effective than individual ones, the necessity of a Sarvajanik Sabha becomes almost axiomatic.

If some instances can be cited to prove that the non-existence of a representative public body has caused enormous injustice in the past, the basis of the Sabna-in-embryo will be strengthened a good deal. It is well-known that the Deshmukhs and Deshpandias now get a percentage on the revenue collections of their Perganahs which is termed Roosum Once it was proposed to abolish it altogether, and had it not been for the exceptionally active and energetic Deshpandia Jamidar of Adgaon the Roosum would have gone to swell the coffers of the Treasury. After very great trouble and difficulty the gentleman succeeded in getting the Roosam recognized by Government. It was a very tardy recognition of the rights of these pergunnah officers and even then, the Government granted only a partial relief. The Roosam was settled once for all on the then collections of the land revenue; before this however it used to increase or decr ease as the revenue increased or decreased. The revenues have since greatly increased and the Jamidars have evidently suffered in proportion. Another instance is the principle of the Patel and Patwari's Law, ignoring all other sharers in the Watan except those that are the most senior of the family. Now it is indeed questionable whether the fixation of the ever increasing Roosam within a particular limit and the principle embodied in the Patel's Law, are really unsound; but assuming that what is *felt* as a public grievance *is*, for the time being at least, a public grievance, there is no doubt that if there had been a Sarvajanik Sabha or any other similar Association, the pros and cons of the subject would have been very carefully represented to Government before a final decision on the subject was passed. Another instance is the suppression of the opium cultivation by a whole sale order preventing poppy cultivation in Berar, causing thereby a perceptible decrease in the profits of land-holders. These instances will suffico as well as many. Now if there had been any Sabha of the proposed type, the grievances would have been placed before Government in a proper light so as to avoid a good deal of injustice.

The proposed Sabha can be based on the Poona Model. It is well-known that Mr. Ganesh Wasudeo Joshi was the founder of the Sarvajanik Sabha at Poona; and a very useful institution it has proved to be. In spite of cavillers, in spite of objectionists and scoffers, the utterances of the Sabha have gained for themselves that influence which hardly any other Association possesses. The promoters of the Sabha were discountenanced, and its supporters tossed hither and thither by the fitful gale of official displeasure; but in the end the Sabha has withered the storm and now stands as an institution worthy of the city where Hindu statesmanship once prospered. The principles of the Sabha could hardly be attacked and the autocratic English papers attacked the constitution of the Sabha. It was urged that the Sabha was not really as thoroughly a representative body as it professed to be, that there were only a few wise fullers at the bottom of the movement and in fact the majority of the public had no sympathies with the Sabha. After all, however, the detractors have been cowed and the Sabha has succeeded.

There is one difficulty, however in establishing a Sarvajanik Sabha for Berar at Amraoti. If the Sabha is to become a really useful institution there must at least be half a dozen persons of acknowledged ability who

are willing, at personal sacrifice, to put their whole and soul into the doings of the Sabha. Unless there are two or three who can soley afford to devote themselves to the Sabha and who have independent incomes, the Sabha can never be a success. This is a difficulty and a mighty one at the very threshold. There are we know a good many gentleman at Amraoti who are capable of undertaking the task; but what strikes us is the question 'will they do it.' We are afraid they wont for any continuous period. There are a good many citizens who would take an intelligent interest in the institution, a few who would help it on; there is also a Local Bar which, not to exaggerate it, is perhaps inferior to none but the Bombay High Court Bar, and yet we venture to suggest the above difficulty Now there are sufficient facts in the past to warrant the presumption that the Amraoti gentlemen can, though will not, be up to the requisite amount of activity. There is we think a want of some very influential man at Amraoti whom all the rest would not consider it below their dignity to follow. Unless this want is remedied matters cannot go on as desired. At present there is reluctant cooperation and many look forward to a day when there will be a Triple Alliance to compare small things with great-under one headman. So long as we are not shown our way out of this difficulty, we cannot be induced to be very sanguine about the practical utility of the proposed Sabha.

---

It is difficult to imagine what makes such a sensible class of people as the English to refuse to Ireland rights and privileges which common sense dictates they should possess. The engine of oppression is to be worked with greater force it appears. The Times of India remarks "if a firm policy is to be carried, it had better be carried out firmly." In other words if oppression and superior force is to be the principle which has to guide the administration of Ireland, let the principle be resorted to without any regard to the result that might follow. And the appointment of Sir R. Buller means that the government intend to carry out the policy of coercion to its furthest limits. To the people of India, it appeared that Ireland would not find much difficulty in obtaining a separate Parliament; but the way in which the Bill of Mr. Gladstone was dealt with has disappointed them. Evictions are now on an increase and Mr. Dillon anticipates trouble in the next winter. We do not understand what difficulty Her Majesty's Government finds in adopting measures more in accord with the wishes and aspirations of the natives. The article in the Nineteenth Century which Mr. Dillon has written shows that partic c a d zealous as he has been he has not the least desire to join in measures which he anticipates and which he thinks will be the inevitable result of the policy pursued by Her Majesty's Government. Even a man like Mr. Dillon had to appear before Law Courts for preaching doctrines which were within the ligitimate bonnds of a national self-government scheme demanded by Irland.

---

The following parting speech made by the Viceroy at Hydrabad shows the estimation in which he holds the contingent.

" Before we separate, I would beg to ask leave, both as a representative of the Queen and as the head of the Government of India, to discharge a very pleasant duty, and that is to express the very great satisfaction I have experienced in coming into contact for the first time with the Hyderabad Contingent. Before I arrived in this neighbourhood, I was well aware of the claims of this distinguished force to the confidence and admiration of its countrymen. Its embodyment dates from a very early period in the history of British rule in this country, and, on many glorious occasions, it has powerfully contributed to the security and extension of our Indian Empire. It had the honour of serving under the Duke of Wellington all through his Deccan and Mysore campaigns, and has never failed to distinguish itself by its valour on the field of battle, its powers of endurance, its loyalty and its excellent discipline. Its cavalry on one occasion performed one of the most remarkable achievements recorded, I believe, in military history, for they covered 600 miles in 31 days and thus earned for themselves the thanks of the Government of India; not only so, but in subsequent times, under the gallant Sir Hugh Rose, the Contingent again rendered the country valuable service, and, whenever opportunity has occurred, its officers and men have always been most eager to volunteer for any duty which might be required of them. Only recently it has been my pleasing duty to designate two of its regiments for service in Burmach, and I am happy to take this opportunity of stating that I hear on all sides most satisfactory accounts of their conduct. Indeed, if proof were wanting of the high estimation in which the Hyderabad Contingent is held by tha Government of India, it would be found in the case of the anxiety which we have taken in selecting officers who have been sent to command it. In General Mc Queen you had one of the most valuable soldiers at our disposal, and, though I was sorry to lose him from the Punjab Frontier Force, I felt he could not be better employed than in having the honour to command you. Again, the officer who is being nominated to succeed General Mc Queen is also held in the highest estimation by my military advisers. I am certain that under his auspices yon will find your position still further improved and your and interests safeguarded. My first acquaintance with the Contingent took place at Aurungabad, when I was much struck with the admirable physique and appearance of the men and the remarkable smartness of the officers, and I consider it a great honour to have had them for my escorts. And now, in Lady Dufferin's name and my own I desire to return to General Bell and the officers of the Hyderabad Contingent our best thanks for the kinuness they have shown us. I assure them that, among the agreeable souvenirs which we shall carry away from Hyderabad, there will be none more pleasant than the recollection of the brief period we have passed in their hospitable cantonment "

General Bell in a brief reply expressed his thanks for the flattering remarks bestowed on the Contingent by his Excellency.

---

The following short reply was given by the Viceroy to the address of the Mysore Municipality. He has made a happy allusion to the movement inaugurated by Lady Dufferin for the better medical treatment of women in India.

" It is a great pleasure to me to find myself in this ancient capital, and I can assure you that I rejoice to think that the generous policy instituted by the British Government, to which you referred in such feeling terms, should have been productive of such fortunate results. I am well aware that there is no State in India which enjoys better government than does Mysore under the administration of its present enlightened ruler and I trust that year by year his prosperity and happiness, and the welfare and advancement of his subjects will still further increase. I am very grateful to you, and now I am speaking in the name of Lady Dufferin for the kind allusion which you have made to her humble efforts to promote improvement in the medical treatment of the women of India. The more the matter is enquired into the more clearly it becomes evident that nothing but a great united effort on the part of all those who are interested in the welfare of their fellow creatures can bring the scheme inaugurated by Lady Dufferin to a successful issue, while at the same time if it be energetically carried out there are few projects which offer a greater prospect of producing satisfactory results. I trust that during my short stay among you I may have the pleasure of visiting the various places of interest in your city and neighbourhood, and of myself witnessing with what energy and intelligence you promote its welfare and prosperity."

---

The account of the Berar Deputation given in the Telegraphic summary of the Times of India is extracted below for the perusal of our readers:-

" The Viceroy yesterday received a deputation representing the inhabitants of Berar- His excellency's short reply chiefly dealt in general terms with the various local questions alluded to in the address. Referring to anallusion to the Civil Service Commission the Viceroy said : -- " I have already had an opportunity of explaining the principles on which the Public Service Commission has been composed. I am sure you all understand that to add in definitely to the members of the Commission would reuder it an unwieldy and impracticable body, and that if delegates from every geographical area in India were to be introduced into it, it would be impossible for it to conduct its business in a satisfactory manner. "

---

Colonel Szczepanski lately tried a sessions case at Kapustalni in the Ellichpoor District, in which a young Pardesi was accused of having brutally murdered his wife. Mr. Cotgrave who represented the Crown was opposed by Mr. Ganesh Nagesh pleader of the Local Bar. The judge showed very great patience during the trial. The accused has been found guilty and is sentenced to suffer the extreme penalty of Law.

Mr. Balkrishna Kashinath who has been lately transferred from the Police Department to act as Tehsildar at Mortizapur was a very popular man at Ellichpur. In making this appointment due notice has been taken of a really deserving man measuring, of course, the work of a person by the amount of his popularity. We are sure the gentleman will prove a successful Tehsildar.

---

## वऱ्हाड.

खामगांवचे आनररी असि० कमिशनर डाक्टर जी० नंदी साहेब यांस या जिल्ह्यांत पहिले वर्गाचे असि. कमिशनर नेमिल्याचे रे. आ. वरून कळतें.

रा. रा. माधवराव बळवंत मंगरूळपीरचे अक्टिंग तहसिलदार यांस १०० रु. पर्यंत काम चालविण्याचा अधिकार दिला असून या जिल्ह्यांत सेकंड क्लास मानि० नेमिलें आहे.

मि. आर. इ. बेवेन साहेब ए० अ० कमिशनर वर्ग पांचवा यांस पूर्वीच्या र० रजेस लागून आणखी २३ दिवसांची बिनपगारी रजा दिली आहे.

रावसाहेब श्रीराम भिकाजी जठार डायरेक्टर आ. पब्लिक इन्स्ट्र. हे आतां बुलढाण्याकडे जाणार आहेत, व रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एज्यु० इन्स्पेक्टर हे कारंजाकडे डौऱ्यावर आहेत.

मुंबइच्या व्हेटोरिनरी ( पशुचिकित्सक ) कालेजांतील डाक्टर कूपर हे थोड्या दिवसा पूर्वी वऱ्हाडांत येऊन गेले त्यावेळी वऱ्हाडांतून सहा विद्यार्थ्यांस स्कालरशिपा देऊन सरकारनें या कालेजांत अभ्यासासाठीं पाठविलें परंतु कालेजचा अभ्यासक्रम संपल्यानंतर ६ वर्षे पर्यंत देतील त्या पगारावर वऱ्हाडांत नोकरी करावी वगैरे जरब अटी घातल्या मुळें बरेच विद्यार्थी परत आले. या अटी बद्दल सरकार पुन्हा एकवार विचार करून कांहीं फेरफार करतील अशी आशा वाळगतों.

हैद्राबाद कांटिजंटमधील इंगोलीची पलटण येथील तुकडी सुद्धां ब्रह्मदेशांत लढाईवर जाणार असल्याचें कळतें.

मे. सांडर्स कमिशनर साहेब हे शुक्रवारीं हैद्राबादेहून परत उमरावतीस गेले.

गेल्या आठवड्यांतील पलटण, मुनिसिपालिटी, व पोलिस या मधील बड्या, मारामारीची चौकशी होऊन मुनि० च्या जमादारास दहा रुपये दंड झाला व पलटणींतील अपराधी म्हणून काढलेल्या सहा असामीस दोन दोन वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

---

( मागाहून आलेली नोटीस )

मुलजी भाटे निसबत तोताराम चुनीलाल दुकान मलकापूर जिल्हा बुलढाणें—यास

तुलसीराम रामचंद्र दुकान जळगांव जिल्हा आकोला यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही जळगांवीं येऊन तारीख १० माहे नोवेंबर सन १८८६ इसवी रोजीं दर खंडीस रुपये ९७॥ प्रमाणें सात खंडी तिळाचा सवदा दलाल मार्फत केला ते तीळ तुम्ही तारीख २१ मिनहू पर्यंत मोजून नेलें नाहींत यामुळें तुम्हांस एकदोन पत्रें ही पाठविलीं त्यांचें उत्तर ही आलें नाहीं. या साठीं असे कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत बाजार भावाप्रमाणें तीळ विकले असतां जे नुकसान येत आहे ते भरून यावें. हल्लीं आम्हांस कमींतकमी दर खंडीस दहा रुपये नुकसान येऊं पाहात आहे तेव्हां नोटिसी प्रमाणें तुम्ही अंमल केला नाहीं तर नोटिशीचे खर्चासह फिर्याद करून भरून घेतलें जातील कळावें. तारीख ९ माहे दिसेंबर सन १८८६ इसवी.

( सही ) तुलसीराम रामचंद्र
दुकान जळगांव.

---

## वर्तमानसार.

आन. दादाभाई नवरोजी हे ता० ५ डिसेंबर रोजीं मुंबईस येणार होते व ते दोन महिने राहून फिरून विलायतेस जाणार यांच्या जाण्या येण्याच्या संबंधानें कांहीं पैसे जमविण्याची खटपट चालू आहे. पु. वै.

मृत्यु — आम्हास लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं वे. शा. स. रा. रा. कृष्णशास्त्री गोडबोले यास गेल्या २२ वे तारखेस सोमवारीं गळ्यास कांहीं आजार होऊन एकाएकी वारले. शास्त्रीबावाच्या मरणानें आमच्या मंडळींतील एक चांगले विद्वान्, उत्तम गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञाते व महाराष्ट्र भाषेतील ग्रंथांत नेहमीं थोडी बहुत भर घालणारे पुरुष नाहींसे झाले.

होळकर महाराज आजारी नसतां ही व्हाईसराय साहेबांच्या लेव्हिस गेले नाहींत याविषयीं बरीच वाटाघाट सुरूं झाली आहे अशीं मुंबईच्या बातमीदारानें कलकत्यास तारायंत्र द्वारें कळविलें आहे. सु. प.

ऐर्लंडांत अजून दंगे धोपे सुरूं आहेत.

नाईट नांवाच्या एका गोऱ्यानें काइरोच्या हद्दींत एका नेटिवास गोळी मारल्या मुळें त्याजवर खटला सुरू आहे. गोळी चुकून लागली अशी त्याची तक्रार आहे.

एक रशियनपत्रकर्ता म्हणतो कीं, रूमेलियामधील रशियन लोकांचे रक्षण तेथें असणाऱ्या फ्रेंच वकिलाकडे सोपण्यांत आलें आहे कारण तेथें जर्मन वकील नाहीं व बलगेरियांतील रशियन लोकांचे रक्षण जर्मन वकिलाकडे सोपविण्यांत आलें आहे. यावरून फ्रान्स, जर्मनी व रशिया यांचें सख्य आहे असें होतें.

मद्रासचे हल्लींचे गव्हरनर सर ग्रांडडफ हे विलायतेस जाण्याकरितां ता०८ रोजीं मुंबईस आगबोटींत बसतील.

ड्यूक आफ कनाट हे पत्नीसह जंमू येथें जाणार असल्यामुळें त्यांच्याकरितां तेथें कडेकोट तयारी चालली आहे. अ. इ.

सिमला येथील म्युनीसिपालिटीचे मनांत आज पुष्कळ दिवस शहरामध्यें एक टाऊनहाल बांधण्याचे आहे; परंतु खर्चाची सवड नसल्यामुळे तें काम आजपर्यंत पडून राहिलें होतें परंतु आतां त्या म्युनीसिपालिटीस टाऊनहाल बांधण्याकरितां १७५००० रुपये देण्याची गव्हरनर जनरल साहेबांचा मंजुरी मिळाली आहे. ही रकम खुद्द गव्हरनर जनरल साहेबांच्या किंवा ज्या युरोपियन लोकांसाटीं ही इमारत बांधावयाची आहे त्यांच्या पेटींतून बाहेर पावयाची असती म्हणजे ह्या संबंधानें अर्थात् आम्हांस कांहीं वाईट वाटण्याचें कारण नव्हतें, परंतु हा सर्व हा पैसा सरकारच्या तिजोरींतून जावयाचा असल्यामुळें सर्व चट्टा अखेर गरीब रयतेवरच येऊन बसावयाचा ह्मणून आह्मास त्याविषयीं वाईट वाटतें. इमारत बांधून तयार झाल्यावर तींत युरोपियन लोकांचे बाल, नाच, वगैरे व्हावयाचे; गोरगरीब लोकांस तेथें नुसते उगीच पाहाण्याकरितां जाण्याची मनाई! वाहवा! आमचे सरकारची कशी अजब समदृष्टी आहे.

बी. एस्सी. च्या परीक्षेस बसलेल्या तीन उमेदवारांपैकीं नसरवानजी फकीरजो सर्वेयर बी. ए. हा मात्र एकच पहिल्या वर्गांत पसार झाला. ने० ओ०

कानपूर नुरुलकर्ता आपल्या ता० ३० आक्टोबरच्या पत्रांत लिहितो कीं, "चंबा संस्थान चा राजा सुचेतसिंग हा पदभ्रष्ट होऊन न्याय मागण्या करितां विलायतेस जाऊन राहिला होता, त्यानें दुर्दैवी धुलिपसिंगाची भेट घेऊन ते उभयतां रशियाच्या झाराकडे गेले आहेत. भेटीअंती धुलीपानें झारास अशी विनंती केली कीं, ज्या प्रांतावर माझा बाप राज्य करीत होता तो प्रांत तुम्ही खटपट करून इंग्रज सरकाराकडून मला देववावा. त्याजवर झारानें उत्तर दिलें कीं, तुम्ही चितराल व काश्मीर या दोनी रस्त्यानीं चढाव करावा; असे करण्यास तुम्हास ज्याप्रकारची फौज पाहिजे असेल तशी मिळेल" वरील मजकुर कितपत खरा आहे याबद्दल आज आमच्यानें कोणत्याही प्रकारें खात्री करवत नाहीं.

व्हाईसराय साहेबांची स्वारी रत्नागिरीस थिबा राजास भेटण्या करिता जाणार होती, परंतु थिबानें भेट घेण्याचे नाकारिल्यामुळें व्हाईसरायाची आगबोट रत्नागिरीस न जातां परस्पर विजयदुर्गास जाऊन तिकडून मुंबईस परत गेली असें म्हणतात. लार्ड डफरीन साहेबानीं ब्रह्मदेशची लढाई चालू केली असल्यामुळें त्या तिटकाऱ्यानें थिबानें भेट घेण्याचें नाकारलें असें वाटतें,

निझाम आणि त्यांचे दिवाण यांच्यांत पडलेला तिढा शांतपणानें मिटवावा, जरी दिवाणाचा अपराध आला तर त्याजवर निझामानीं पांघरूण घालावें अशा अर्थाची तार दक्षणेतील ५०० मुसलमान लोकांनीं निझामास केली आहे. म० मि०

विजेची टोपी:—मि. जार्ज लिचेनफील्ड यानें एक विजेची टोपी काढिली आहे. या टोपींतील विद्युत्‌यंत्र इतकें लहान असतें कीं तें टोपीच्या अस्तरांत कोठेंही बसविता येतें. याचें वजन अवघें तीन ड्रम असतें तथापि यापासून उत्पन्न होणाऱ्या विद्युत्प्रवाहाचा जोर बराच असतो त्यानें एकादी लहानशी घंटा सहज वाजविता येईल. या टोपीपासून हरप्रकारचें डोकें दुखणें न्युराल्जीया वगैरे पीडा नाहींशा होतात तसेंच इच्या योगानें केसाला चांगली वाढ येते व टक्कल वगैरे पडलें असल्यास भरून येतें, असें म्हणतात.

नातवंड:—आमच्या महाराणी साहेबांची आवडती मुलगी बित्रस जिचें गेल्या वर्षीं लग्न झालें ती गेले मंगळवारीं प्रसूत होऊन तीस पूत्ररत्न झालें. तेणेंकरून ह्या आनंदकारक बातमीच्या सर्व देशभर तारा गेल्याचें समजतें. दी० बं०

गव्हरनर, गव्हरनर जनरल सारखे बडे अधिकारी यांचे प्रवास रयतेस कोणत्याही प्रकारें हितावह दिसत नाहींत; पण उलट या प्रवासांनीं तीस बराच चट्टा बसतो, राजेरजवाडे पुष्कळ खर्च यांच्या आदरसत्कारासाठीं करितात, आणि प्रजा व संस्थानिक यांचा आदरातिथ्य व भंवळशाही थाट पाहून, हिंदुस्थान सालोसाल दरिद्री होत आहे अशी ओरड करणार निवळ खोटे आहेत, असा पक्का ग्रह अधिकाऱ्यांचा होत असेल हें आमचें फार मोठें नुकसान होत आहे. शु०सू०

गेल्या २२ वे तारखेस ८० दंगेखोर लोक भामो येथील छावणींत शिरले आणि बराकी व चौकी यांस आग लावून निद्रिस्त असलेल्या तिघां युरोपियनांस ठार मारिले इतक्यांत इंग्रजी फौजेने त्यांच्यावर हल्ला केला, पण ते डोंगरात पळून गेले. त्यांच्यांतले ३ ठार झाले.

गेल्याच्या मागील आठवड्यांत मुंबईकडून येणारी शेफर्ड कंपनीची वाशिष्टी आगबोट इकडे येत असतां विजय दुर्गाजवळ खडकास लागून फुटली. तसेंच उरण आगबोटही पांवशी जवळ रणपार येथील खडकास लागून फुटली. फक्त त्यावरील एक उतारू गरोदर औरत मात्र दगावली. समुद्र त धुकें फार असल्यामुळें असा भयंकर परिणाम झाला असें म्हणतात. वैं०वृ०

सोफिआ, ता० १९ नोवेंबर—बलगेरियन रिजेन्टाचे व त्यांच्या कार्यास झटणाऱ्या इतर मंडळीचे खून करण्याचा बेत वयाडेटूस स्कूलांत उद्भवला होता तो उघडकीस आला. कित्येक लोकांस कैद करण्यांत आलें आहे.

लंडन, तारीख २७ नोवेंबर—पोर्ट ह्यामिलटन, चिनास देण्याविषयीं इंग्लन्ड आणि चीन यांच्या दर्म्यान बोलणें चाललें आहे.

उदार देणगी—कौन्टेस आफ् डफ्रिन फंडाकडे जयपूरच्या महाराजांनीं एक लाख रुपये वर्गणी भरली असें समजतें. इतकी उदार देणगी हिंदुस्थानांत निदान ह्या सत्कृत्यांत कोणीच दाखविली नाहीं. ज्ञा० च.

---

## ज्योतिष्प्रकाश

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, आम्ही सन १८८५ च्या जानेवारी माहे न्याच्या १ल्या तारखेपासून ज्योतिःप्रकाश या नांवाचें मासिक पुस्तक काढीत आहोंत-त्यामध्यें पत्रिका, वर्षफलें, मासफलें, दिनफलें, प्रश्न संबंधी फले, रमलशास्त्र; स्वरशास्त्र, केरलशास्त्र पंचपक्षी, सुर्यसिद्धांता दिसिद्धांत, लीलावती, बीज, आणि विवाहमौंज्यादि सकल मुहूर्तानिष्काशनप्रकार, इत्यादि संपूर्ण ज्योतिषशास्त्रीय विषयांची अति सुलभ रीतीनें माहिती क्रमाक्रमानें दिली जात आहे आणि इंग्रजी रीतीनें प्रत्येक महिन्यांतील प्रति दिवसाचे स्पष्ट ग्रह दिले जातात.

या पुस्तकाची किंमत सालाचे ३ रु० व टपाल खर्चाबद्दल ६ आणे एकूण ३ रु. ६ आणे व मागाहून ४ रु. ८ आणे ठेविली आहे.

किरकोळ अंकास किंमत ६ आणे पडेल

वर्गणीचे पैसे मनीआरडर करून पाठवावेत, तिकिटें पाठविणें झाल्यास वर्तावळ्या सहित पाठवावींत.

वर्गणी अगाऊ आल्याखेरीज पुस्तक पाठविलें जाणार नाहीं.

वर्गणी आमच्या नांवें पाठवावी.

तारीख १३ नोवेंबर सन १८८६

नारायण गोविंदराव कडलक.
नानाच्या पेठेंत घोडेपिरा जवळ
घरनंबर २८४, पुणें

---

## विक्रीस तयार,

SAPKAR'S DIARY
FOR 1887
WITH A CALENDAR
EOR 1888.

सापकरांची रोजनिशी

## सन १८८७ साला-करितां.

यांत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आंफिसांत व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजी विवहाचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टाप, मनिआर्डर्स, पोष्ट, मुंबई ब्यांकेच्या रूढी, सिव्हील प्रोसिजर, मुदतिचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलीस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याचे माहितीचें कोष्टक दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदरांची व कांहीं कोरी पृष्टें जोडलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत | | ट. हा. |
|---|---|---|
| प्रत नंबर १.... ....... | ०१२ | ०२ |
| प्रत नंबर २.... ....... | ०८ | ०१॥ |
| प्रत नंबर ३........... | ०७ | ०१॥ |

किमतीबद्दल रोख पैसे आम्हाकडे पाठेविले असतां रोजनिशी तयार होतांच रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक

---

## जाहिरात.

सर्व लोकांस या जाहिरातीनें कळविण्यांत येतें कीं तालुके मेळघाट प्रांत वऱ्हाड यांतील बैरागड बंदी रायपूर व माखला या दोन ब्लाकांत चांगलीं सागवानीं झाडें सुमारें १,००० हजार व शिवाय दुसरें प्रकारचीं अडजात पुष्कळ झाडें लिलावानें विकण्याचीं आहेत ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं बैरागड बंदींतील फारेष्ट रेंजर यांस जाऊन भेटावें. ज्यास्त माहिती व अटी फारेष्ट रेंजर बैरागडबंदी यांज पासून मिळतील.

मुक्काम उमरावती.
ता०१७ माहे नोवेंबर सन १८८६ इसवी.
सही. जी. जे. व्ह्यान सॉमेरेन
ले. कर्नल.
कानसरवेटर ऑफ फारेस्टस.
वऱ्हाड.

---

☞ हें पत्र आकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

वर्षाची आगाऊ रु० ५ टांकहशील ०१३
सहामाही " ३ " " ०८
साल अखेर " ७ " " ०१८
किरकोळ अंकास.......................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१६
दुसरे खेपेस ........ ०१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

SUBSCRIPTION RATES
RS.
Per annum in advance 5 Postage 13 as
Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
Single copy.............................. 4 as

Advertisements.
Below 10 lines...2Rs
Per line over 10...4as
Repetition per line 3as

VOLXX AKOLA MONDAY 13 DECEMBER 1886 NO 48
पुस्तक २० अकोला सोमवार तारीख १३ माहे दिसेंबर सन १८८६ इ० अंक ४८

## वेदातग्रंथ.

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर. १९ "
सन १८८६ इ०
नमुना. ( जी. )

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हा आकोलें यांचे कोर्टांतून सर्व लोकांस प्रसिद्धं करण्यासाठीं कळविण्यांत येतें कीं, जगंनाथ लालमन ब्राम्हण राहणार पिंजर ता० आकोळें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव जाहला आहे. आणि तारीख ४ माहे ज्यानेवारी सन १८८७ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्याकारितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं या बदल आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज लिहून त्या आर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आधार आणि त्याबद्दल ज्यास साक्षीस समन्सें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नावें दाखल करावी. ही नोटीस नेमण्याकारितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीनादिवस पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्याकारितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे ष्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

२ जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याच्या ष्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या ज्यूडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. ता. ७।१२।८६. इ०

Mahomad Yasinkhan
जपडुज्ज.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

( हैद्राबादेकडील बातमीचें पत्र. )
( आमच्या एका मित्राकडुन )

हैद्राबाद ता० ४।१२।८६

पुरातन काळीं आपली आर्यभूमि संपत्तीनें विपुल भरलेली होती त्यावेळीं स्वयंवरादि मंगल कार्यांच्या निमित्तानें झालेल्या

१८ व नं

आणे मोठमोठ्या भव्य आनंदोत्सवांचीं वर्णनें आपल्या पुराणांतरीं वाचितों. दुर्दैवानें ते दिवस निघून गेल्या कारणानें असले प्रसंग आर्तांच्या लोकांच्या कदाचितच दृष्टीस पडतात. फक्त मुंबई सारख्या मोठमोठ्या शहरीं व राजधान्यांत कधींकधीं असले प्रसंग पाहण्यांत येतात परंतु ते फार विरळा. असाच एक उत्सह गेल्या आठवड्यांत आमच्या हैद्राबादच्या लोकांच्या दृष्टीस पडला. खरोखर गेल्या महिन्याच्या २४ तारखेपासून २७ पर्यंत हैद्राबादेस प्रत्यक्ष स्वर्गच खाली उतरला कीं काय असें वाटत होतें. लार्डडफरिन सारखे पाहुणे यावयाचे मग काय! पाहुणचाराला २०००-०० रुपयांचे सांक्शन. एकंदर सर्व थाट खरोखर फारच वर्णनीय उतरला. काय तो नगराचा शृंगार, ती रोषनाई, ते जागोजाग उभारलेले मंडप, त्या भव्य आणि सुशोभित कमानी तो दीपोत्साह, ती अग्निक्रिडा, त्या मेजवान्या आणि ते दरबार; सर्वच अनुपमेय एकंदरींत हे ४ दिवस आमच्या इतिहासांत प्रासिद्ध आण महत्वाचे होऊन गेले यांत संशय नाहीं. चार दिवस शहरांत जिकडे तिकडे कशी गडबड उडून गेली होती. असो सर्व व्यवस्था जिकडे तिकडे यथास्थित होऊन कोठें कांहीं अनिष्ट न होता सर्व सोहळा यथासांग सिद्धीस गेला ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

व्हाइसराय साहेबांची स्पेशल ट्रेन तारीख २४ रोजीं तिसरे प्रहरीं ५ वाजतां येऊन थडकली, तेव्हांपासून तों तें हें शहर सोडीपर्यंतचे सर्व विधि अगोदर प्रासिद्ध केल्याप्रमाणें सर्व यथास्थित व मोठ्या थाटानें शेवटास गेले. धूळभेटी. मेजवान्या, दिपोत्सव, तमाशे, दरबार, गूझभेटी, वगैरे सर्व गोष्टी मोठ्या भव्य रीतीनें झाल्या. तारीख २६ रोजीं सकाळीं १० वाजतां आपल्या प्रांतातील कांहीं प्रमुख लोक व्हाईसराय साहेबांनां मानपत्र देऊन आले होते त्याच्या स्विकाराचा थाट रेसिडेंसि दरबार हॉलमध्यें झाला. व्हाइसराय साहेबांनीं आपल्या मानपत्राचा स्वीकार करून व मंडळीच्या ओळखी ही करून मानपत्राला चांगलें उत्तर ही दिलें. लेडी डफरीन फंडाच्या संबंधानें आपल्या प्रांतांत झालेल्या खटपटीबद्दल साहेबांनीं आभार मानले व हायकोर्टाविषयीं केलेल्या प्रार्थना योग्य आहेत व त्या मला संमत आहेत असें ही बोलून दाखविलें. एकंदरींत आपल्याकडील डेप्युटेशनचा हेतु चांगल्या रीतीनें सिद्धीस गेला असें लिहिण्यास हरकत नाहीं असो.

व्हाईसराय साहेब तर तारीख २८ रोजीं मोठ्या थाटेस मद्रास कडे निघून गेले परंतु ज्या कार्यासाठीं ते येथें आले होते त्याबद्दल निकालाची गोष्ट अद्यापपर्यंत तर कांहीं जरीशी बाहेर आली नाहीं. लोकांमध्ये मात्र गटार यंत्रातून एक एक गप्पा बाहेर निघत आहेत कोणी ह्मणतो. व्हाइसराय साहेबांनीं दिवाण साहेबांना काढून टाकण्याविषयीं आपली संमती दिली व त्याप्रमाणें निजाम साहेबांनीं त्यांना ( दिवाण साहेबांना) हुकूम ही दिला आहे. कोणी म्हणतें छेः! सर सालरजंगचे हे चिरंजिव आहेत त्यांना काढून टाकतां येत नाहीं. व्हाइसराय साहेब दोघांच्याही तोंडावर हात फिरवून चालते झाले आहेत. याप्रमाणें गप्पावर गप्पा चालल्या आहेत. खरें काय ते अद्याप कळत नाही. एकंदरींत आमच्या राजाची सध्यां शोचनीय स्थिति खरी. काय हो पहा धन्याचे व चाकराचें भांडण आणि त्यांत धनी पाहिजे तें करण्यास समर्थ असतांही मध्यस्ती करणार दुसराच. कांहीं असो सध्यां लोकांना मात्र पाहिजे तशी गडबड करण्यास फावलें आहे खरें.

व्हाइसराय साहेब येथें असतांच गांवांत दाट बातमी पसरली होती कीं दिवाण साहेबांना काढून टाकण्याचा निजाम साहेबांचा पक्का निश्चय झाला आहे व तो शेवटास नेल्यावांचून ते कधींही राहणार नाहींत. त्याच प्रमाणें अमीर कबीर, नबाब विहकार अल उमराव, पेशकार साहेब, आणि फकीरउल मुल्क या चार अमीरांची नावें ही दिवाण गिरीचे संबंधानें पुढें येत आहेत. लोकांचा तर समज होऊन गेलें आहे कीं या चौघांतून कोणाला तरी दिवाण गिरीचीं वस्त्रें मिळतील. हजार वाटेनें सालरजंग यांना आपली जागा सोडावी लागेल असें वाटतें व त्यामुळें त्यांच्याविषयीं सर्वांना वाईट वाटते आहे वास्तविक सालरजंग साहेबांचाही कांहीं अंशी अपराध खरा त्यांनां तरी अलिकडे निजाम साहेबां विरुद्ध वर्तन करण्याचें बरेंच मनावर घेतलें होतें व यासर्वांना कारण वजीर साहेबाजवळील कांहीं मंडळी होय. ही मंडळी नेहमीं त्यांना चियावून देत असत. तिजकडून निजाम साहिबाशीं विरुद्ध वागतां येईल तितकी त्यांना भेट देत असते या मंडळीचे मात्र दांत पक्के पडतील यांत संशय नाहीं.

परवाच्या दिवशीं तर गांवांत जिकडे तिकड खात्रीची बातमी उठली कीं उद्यां ३० वे तारखेस संध्याकाळीं निजाम साहेब दरबार भरवून सालरजंग यांना राजी नामा देणार व त्या मुळें गांवांत जिकडे तिकडे बरीच गजबज झाली होती. परंतु त्या प्रमाणें काल मुळींच घडून आलें नाहीं आजतर लोक म्हणत आहेत कीं दिवाण साहेब कायमच राहणार. मात्र त्यांचे कांहीं अधिकार निजाम साहेब काढून घेणार आहेत त्या मुळें कदाचित् त्यांना राग येऊन त्यांनीं आपण होऊन राजीनामा दिला तर न कळे. कांहीं असो सध्या आमच्या दिवाण साहेबांच्या प्रकरणाचा कांहीं तरी निकाल होई पर्यंत सर्व लोकांत मोठी अस्वस्थता उत्पन्न झाली आहे खरी. ईश्वर काय करील न कळे. हे दिवाण साहेबांच्या संबंधानें झालें. याशिवाय निजाम साहेबांच्या खजिन्यांत व टकशाळेंतही बराच गोंधळ झाला आहे असें लोक बोलतात. काय अफरा तफर झाली आहे ती अद्याप बाहेर आली नाहीं परंतु बरीच गडबड झाली आहे यांत संशय नाहीं. याप्रमाणें मोठ मोठ्या अमीर लोकांतही बरीच गडबड उडाली आहे व कित्येक दरबारची मंडळी आपापल्या जागांचे राजीनामे देण्यास तयार झाली आहे असेंही म्हणतात खरें काय आहे परमेश्वर जाणें. कोणी म्हणतात मुंबईचे क्राफर्ड साहेब येणार आहेत व त्यांच्या साह्यानें निजाम साहेब आपल्या राज्यांतील हा झालेला घोटाळा दूर करणार! परमेश्वराची मर्जी. कांहीं असो सध्यां आमच्या या राज्यांत लहाना पासून मोठ्या पर्यंत जिकडे तिकडे चळवळ होउन गेली आहे व सर्वांचे डोळें काय निकाल होतो तिकडे लागले आहेत. एकंदरींत थोड्याच दिवसांत आमच्या राजधानींत मोठ मोठ्या कांहीं तरी घडामोडी घडून येतील असें चिन्ह दिसत आहे. काय होतें पहावें.

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष वद्य २ शके १८०८

## प्रवास

( मागील अंकावरून पुढें चालूं )

इतर पुष्कळ प्रवाशांनींही रानटी लोकांची स्थिति त्या लोकांत फिरून व त्यांचे मध्यें राहून पाहिली व त्या विषयीं हकीकत लिहिली. त्यामुळें मनुष्य जातीविषयीं पुष्कळ शंका दूर झाल्या व एकंदर मनुष्यजातीचे उत्पत्ती संबंधानें जें आजपर्यंत मोठें गूढ होतें व त्याची इतकी सुधारणाइ कशी होत आली या विषयीं जें मोठें कोडें होतें तें थोडेंसें उकलत चाललें व त्याच प्रमाणें दिवसानुदिवस शोध लागत गेल्यास थोडक्याच काळांत हल्लीं असलेल्या माहीती पेक्षां पुष्कळ व खात्रीलायक हकीकत आपणास कळण्याचा

चें फळ आहे. अर्थात् प्रवास म्हटला म्हणजे नुसतें या ठिकाणाहून त्या ठिकाणीं जाणे इतकेंच नव्हे याहून फार जास्त आहे. प्रवासांत डोळे उघडे ठेविले पाहिजेत म्हणजे प्रत्येक नवा गोष्टी कडे, नवी राज्यपद्धति असो अगर एखादी विशेष सामाजिक गोष्ट असो अगर चमत्कारिक सृष्ट पदार्थ असो या सर्व गोष्टीकडे लक्ष असलें पाहिजे व त्या संबंधानें जेवढें जेवढें चमत्कारिक आपणास वाटेल तेवढें तेवढें एकत्र करून लिहून ठेविले पाहिजे म्हणजे त्यापासून एका मनुष्याचे अनुभवानें पुष्कळ लोकांचा फायदा होणार आहे व त्यांस चांगली खात्रीलायक माहिती मिळणार आहे. असा ग्रंथ पूर्वी चिनांतून हिंदुस्थान देशांत आलेले गृहस्थांनीं लिहून ठेविलेले आज मिळतात सांपडतात त्यावरून हिंदुस्थानची पूर्वीची स्थिति काय होती याविषयीं बरीच माहिती सांपडते. प्रवास करणें तो या सर्व गोष्टी लक्षांत ठेऊन केला असतां त्यापासून फायदा होणार आहे. वायफळ प्रवास करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

अलिकडील काळांत प्रवास करणाराची सामग्री बरीच असली पाहिजे व याचें अंगीं वर सांगितलेल्या गुणांखेरीज पोहण्याचे व घोड्यावर बसण्याचे गुण अगदीं अवश्य असले पाहिजेत. प्रवासाचे सामग्रींत तसबिरा काढण्याचें यंत्र जरूर असलें पाहिजे, चित्रकला ही त्यास अवगत पाहिजे व इतर नेहमीं लागणारें सामान तर असलेंच पाहिजे. प्रवासापासून आपला स्वतःचा फायदा करून घेणें असल्यास आपल्या प्रवासाची हकीकत छापून प्रसिद्ध केली तर त्या पासून पुष्कळ प्राप्ति होण्याचा संभव आहे. पुर्वीच्या मानानें पाहिलें असतां हल्लीं प्रवास करणें फार सुलभ झालें आहे व खर्च ही त्या मानानें फार कमी लागतो. मुंबईत कुक आणि कंपनी या नांवाची मंडळी आहे ती ९००० रुपयांत जगांतील मोमोठीं शहरें वगैरे जेवणा खाण्याचे खर्चा सुद्धां दाखवून आणिते. ९००० रुपयांत इतक्या गोष्टी पाहाण्यास सांपडल्यावर आणखी स्वर्ग तें काय असावें!

वऱ्हाडांतील लोकाना आपलीं घरें सोडुन इतर ठिकाणीं जाण्याची बिलकुल सवय नसे कित्येक जमादार व थोरथोर लोकांचा तर असा बाणा असे कीं आम्ही अमुक पिढ्या घरें सोडलींच नाहींत. हा अशी बहादर मंडळी पक्के कूप मंडुक खरे यास इतर देशांची माहिती व्हावी कशी! आतां मात्र जाण्या येण्याचीं साधनें पुष्कळ झालीं आहेत व वऱ्हाडांतील लोक ही केवळ दक्षिणेंतील लोकांप्रमाणें निद्रिस्त्या झाले आहेत असें नाहीं तर त्यांनीं अशी संधि न दवडतां इतर प्रांत पाहून यावें इतर देशांत जरी कदाचित जाणें न झाले तरी हिंदुस्थानांतिल मोठमोठ्या ठिकाणी तरी जाऊन तेथील पाहाण्याजोग्या वस्तु पाहून यावें. प्रवासानें व्यवहारास व मनुष्याचे मनास काय फायदा आहे हें वर दर्शविलेंच आहे तोच फायदा आमचे येथील मंडळीस होणार आहे. मुलांचीं लग्में करून त्यांत व्यर्थ खर्च करण्यात किंवा फीर्यादी करून त्यांत पैसे घालविण्यापेक्षां प्रवास करून त्यांत पैसा घालविणें म्हणजे त्या पैशाचें चीज करणें होय यांत संशय नाहीं.

---

निजाम साहेबांच्या राज्यांत हल्लीं चालूं असलेला घोटाळा पाहून आम्हांस फार वाईट वाटतें. आजपर्यंत फक्त निजाम साहेब व त्यांचे दिवाण सर सालरजंग यांचेच कांहीं कारणावरून वैमनस्य पडलें आहे असें आह्मी समजत होतो. परंतु गेल्या आठवड्यांत तिकडील ज्या बातम्या येत आहेत त्यावरून त्या राज्यांत बराच घोटाळा होत गेलेला आहे असें म्हटल्या वांचून राहवत नाही. व्हाइसराय साहेबांच्या आगमनाचा हेतु निजाम साहेब व त्यांचे दिवाण यांचे मधील बेबनाव काढून टाकून त्यांची समेट करावी हा होता. त्याप्रमाणें ते येऊन तर गेले परंतु त्यांनीं काय केलें हें अद्याप समजत नाहीं. तारीख २९ रोजच्या हैदराबादच्या ज्या तारा आल्या त्यावरून व्हाईसराय साहेबांनीं दिवाण साहेबांस काढून टाकण्या विषयीं आपली संमती दिली व त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं दरबार भरून त्यांचा राजीनामा घ्यावयाचा होता परंतु लागलेच दुसऱ्या दिवसांच्या तारां वरून ती गोष्ट खोटी ठरली व दिवाण साहेब बहुत करून कायम राहतील अशी खबर आली. या संबधानें हैदराबादेच्या लोकांतही बरीच चळवळ झाली आहे असे दुसरीकडे छापलेल्या हैद्राबादच्या पत्रावरून कळतें. या गोष्टीचा निकाल तरी काय होणार ? आमच्या मतें कोणी तरी एकानें गम खाल्ली पाहिजे. दिवाण साहेबांनीं केवळ आसपासच्या लोकांच्या नादीं भरून दुराग्रहांत पडावें व त्यांत आपलाच तोटा करून घ्यावा हें बरें दिसत नाहीं. कोणी असें ही ह्मणतात कीं त्यांना काढून टाकण्याचा निजाम साहेबांचा दृढ निश्चयच झाला आहे तेव्हां हें प्रकरण इतके हट्टास पेटण्यास कारण ही तसेंच मोठें झालें पाहिजे. कांहीं असो, या गोष्टीचा निकाल करण्यापूर्वीं जिकडून आपलें व आपल्या प्रजेचें कल्याण होईल असें निजाम साहेबांनीं करावें असें आम्हांस वाटतें. उगाच एखाद्याच्या गोडबोलण्यास भुलून कोणी भलताच गृहस्थ असल्या जागेवर आणूं नये यांत त्यांचें व त्यांच्या प्रजेचें कल्याण आहे.

वरील मजकूर लिहिल्यावर हैद्राबाद संबंधाच्या आणखी पुष्कळ गोष्टी बाहेर आल्या आहेत त्यावरून हैद्राबादेस बराच घोटाळा होऊन गेला आहे हें उघड दिसत आहे. टांकसाळींत बरीच अफरातफर दिसून आली आहे व दरबारांतील मोठमोठे लोक आपलीं कामें सोडून देत आहेत. खुद्द निजाम साहेबांचे प्रायव्हेट सेक्रेटरी सय्यद हुसेन बेलग्रामी हे आपल्या कामावरून दूर आहेत. पण काय कारणानें तें कळत नाहीं. अबदुलहक्क यांना रेलवे स्किमाच्या कमिशनाबद्दल जे ३३ लाख रुपये मिळाले आहेत ते परत करण्याविषयीं हुकुम झाला आहे. या शिवाय दुसऱ्या बऱ्याच आणखी घडामोडी होण्याचा संभव दिसत आहे. वरील गोष्टी ऐकून कोणाला ही वाईट वाटल्या वांचून राहवणार नाहीं. हैद्राबाद सारख्या पहिल्यांच्या प्रहतीच्या संस्थानाची अशी शोचनीय व्हावी फार स्था व्हावी ही गोष्ट फारच दिलगिरीची आहे. परमेश्वर करो व सर्व घोटाळ्यांचा लोर निकाल निजाम साहेब व त्यांची प्रजा आणि हितावह होवो !

निद्रि- मा- यवर ले.

---

# विद्याखात्या संबंधीं फिन्यान्स कमिटीच्या सूचना.

---

हिंदुस्थान सरकारला अवाढव्य खर्च लागत असल्यामुळें कोणकोणत्या बाबी कमी करतां येतील व कोणत्या खात्यांत काटकसर करतां येईल याविषयीं विचार करण्याची हिंदुस्थान सरकारांनीं एक 'फिन्यान्स कमेटी ' यानांवाची एक मंडळी नेमिली आहे. त्यामंडळीचे सूचनेनुरूप पुष्कळ खात्यांतून खर्च कमी करावा असें सरकारचें मत आहे. विद्याखात्याचे संबंधानें कमीटीचें मत त्याखात्यांतील पुष्कळ खर्च कमी करून कांहीं हायस्कुलें बंद करावीत अशाविषयीं सूचना आहे असें ऐकण्यांत आहे. ह्या सूचना अद्यापि प्रसिद्ध झाल्या नाहींत. तरी अशा प्रकारचा त्या कमेटीचा कल असल्याबद्दल बूट बराच बाहेर पडला आहे. पुणें येथील डेक्कन कॉलेज नांवाची पाठशाळा मोडून टाकावी अशी एक सूचना कमेटीकडून झाल्याचें यापूर्वींच ऐकण्यांत आलें होतें व त्यावरून एकंदर विद्याखात्यांत देखील खर्च कमी करण्याचें कमीटीचें मत असण्याचा संभवही आहे. अशा प्रकारच्या फिन्यान्स कमेटीच्या सूचनांचा विचार करणें फार अवश्य आहे.

पुणें, मुंबई, अहमदनगर, सुरत वगैरे मोठमोठ्या ठिकाणीं जीं हायस्कुलें आहेत तीं किंवा निदान त्यांपैकीं बरीच काढून टाकण्याविषयीं कमेटीची सूचना आहे. असें झाल्यानें दोन गोष्टी पैकीं एक गोष्ट खचित होणार आहे. एक तर हायस्कुलांतलें शिक्षण हल्लीं मिळत आहे तें म्हणजे म्याट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंत मिशनरी लोकांचे हातीं जाईल, किंवा एत्तद्देशीय ग्रहस्थांनीं शाळा काढल्यास त्यांचे हातीं जाईल. सरकारी शाळां मधून आज जें शिक्षण मिळत आहे तें इतक्या चांगल्या तऱ्हेचें आहे कीं पुष्कळ लोकांची प्रवृत्ति पाद्री लोकांनीं काढलेल्या शाळांकडे फारशी होत नाहीं. परंतु ठिकाठिकाणच्या सरकारी शाळा बंद झाल्या तर मात्र मिशनरी लोकांचे पिकणार आहे. हल्लीं पाद्री लोकांचे शाळांतून ख्रिस्ती धर्माचें शिक्षण देत असतात; परंतु फारशी सक्ती करतां येत नाहीं. कारण मुख्यत्वें हेंच कीं सक्ती केल्यास मुलें सरकारी शाळांत निघून जातील. हे भय सरकारी शाळा काढून टाकल्या नंतर नाहींसें होणार आहे. कदाचित् कोणी म्हणतील कीं पाद्री लोक जर धर्म शिक्षणाविषयीं सक्ती करण्याचा यत्न करतील तर लोक आपल्या खासगी शाळा काढतील व आपल्या मुलांचीं मनें दूषित होऊं देणार नाहींत. परंतु यास उत्तर असें आहे कीं एत्तद्देशीय सुशिक्षित लोकांनें तय ... ळा बंद झाल्या म्हणजे अर्थांतच मिशनरी लोकांचें हातीं शाळा पडतील यांत संशय नाहीं. पाद्री लोकांचे हातीं शाळा गेल्यानें मुलांस जरी धर्म संबंधानें सक्ती कदाचित् झाली नाहीं तरी मुलांचें कोंवळें मनावर ख्रिस्तिधर्म शिक्षणाचा ठसा उमटण्यास फार चांगलें साधन होणार आहे. हिंदुधर्माचें शिक्षण पूर्वीं जसें मिळत असें तसें हल्लीं मुलांचे घरोघर मिळत नाहीं, व म्हणूनच ख्रिस्ती धर्माचीं मतें मुलांचें अंतःकरणांत प्रवेश करून एकंदर आमचे हिंदुधर्माचा संहार करण्यास खाचित कारण होतील. लहान पणा पासून आपणांस ज्या गोष्टी नेहमीं शिकवाव्या त्यांचा ग्रह आपले मनावर किती पक्का होतो हें सर्वत्रांस ठाऊक आहेच, व या मुळेंच जरी प्रत्यक्ष रीतीनें धर्माची दिक्षा घेण्याचा जुलूम होणार नाहीं तरी वर सांगितल्या प्रकारची मोठी भिति आहे. हें स्पष्ट होत आहे. त्यातून पाद्री लोकांस द्रव्याची वगैरे अनुकुलता उत्तम असते; त्यास खाण्यापिण्याची मुळींच काळजी नसते. कोणतेही प्रकारानीं आपला धर्म प्रसृत व्हावा या बद्दल तर त्यांनीं विडाच उचलला असतो; व आपला सगळा जन्म ते त्यांत घालवितात. अशा मनुष्यांचे हातीं आमच्या देशांतील मुलांचें शिक्षण गेल्यास खाचित अनिष्ट परिणाम होतील असें आम्हांस वाटतें.

( पुढें चालेल )

---

नारायण गोविंदराव कडलक.
नानाच्या पेठेंत घोडेपिरा जवळ
घरनंबर २८४, पुणें

विक्रीस तयार,
SAPKAR'S DIARY
FOR 1887
WITH A CALENDAR
EOR 1888.
सापकरांची रोजनिशी
सन १८८७ साला-

---

The Berar Samachar

MONDAY 13 DECEMBER
1886

## OUR STUDENTS AT THE VETERINARY SCHOOL AT BOMBAY.

The Veterinary Department has come into existence in Berar only of late— and that too more or less as an experiment. There can be no question that in a country like India which is dependent mainly if not solely, on its agriculture and the future prospects thereof, the concomitants of agriculture should also be improved so far as possible. Cattle are by no means an insignificant factor in the agricultural scheme of this province and it is therefore plain that anything done to promote the well being of cattle, whether by the successful breeding and rearing up of a stronger race of bullocks and other cattle or by the prevention of under mortality amongst them by a timely treatment of wholesale or individual diseases, will be looked upon with satisfaction by all who have any interest in the agricultural

वर्षाची आगाऊ रु० ९ टांकहशील ०१३
सहामाही " ३ " " ०८
साल अखेर " ७ " " १०८
किरकोळ अंकास.......................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .........०१

वऱ्ह

VOLXX AKO

पुस्तक २० अ



## वेदातग्रंथ.

१८ व नं
आणे ०
०८८
पाव

prospec- मराठी अर्थ व स- ...er tempting so as to draw ...any persons to it; with a stra... a dis-regard to this well-established rule, the conditions on which the students are to be maintained during their three years' course at Bombay are calculated to discourage those that mean to study there. The first condition is that the students after qualifying themselves at the Bombay Veterinary School should serve the (Berar) government for six years *on such rate of pay as government may determine.*' The period of six years is unreasonable, when government has the option of making these students work on 8 or 10Rs. a month or a ghorawalla's pay if they choose to do so. Surely this is not very encouraging. The second condition is that if the student is dismissed from the school or voluntarily leaves on any account before the period of six years of service is over he is to refund 'all the monies which may have been paid by Government in the form of any pay or allowance or College expense of any sort.' Nothing can be more absurd than this. Perhaps this is not to be wondered at when the framer of these conditions is identified with a person whose idea of despatching Judicial business is to 'do off 300 civil suits *easily* during the course of a month. We hope the conditions are framed in a more reasonable spirit so as to be elastic enough at least for the present.

We heartily endorse the view of the correspondent of the 'Vaidarbha' who refers to the non-eligibility of persons getting less than 50 Rs. to appear at the Higher and Lower Standard Examinations in Berar. The passing in the Higher and Lower Standard is not a condition precedent, as one might naturally suppose to promotion. Many instances have lately occurred which prove that room has to be made in the Tehsildar's line for persons who are backed by superior official influence. This sort of treatment often mars the prospects of deserving persons. However that may be, it is quite certain that a change in the rules regulating the eligibility to appear at these examinations is necessary. If the examinations are meant to test the ability of people who are in service, so as to make that a standard for their future promotion, the hard and fast rule about a man getting so many dibs before he can at all appear for these examinations, is worse than useless. The present rule as it stands precludes competent men from bringing themselves to the notice of their superiors.

There is also another and a very substantial long-standing grievance ...e native clerks of the English ...s of the Deputy Commission... In the English branch of these ...es the higher appointmetns are ... by European and Eurasian ...s who tenaciously cling to office ... form a sung ring which is hard... broken by the subordinate native ...rks. The disproportion in their ...ys is also very great. The follow...g table will show the average pays ...f the two sets.

| | Number of clerks and pays. | |
|---|---|---|
| | Europeans & Eurasians | Natives |
| Amraoti D. C's. office. | 3 clerks— 340 Rs. | 4cl—230R. |
| Elichpur ............Do. | 2 " — 180 " | 4cl—310 " |
| Wun ............Do. | 5 " — 450 " | 1cl—40 " |
| Akola ............Do. | 3 " — 340 " | 4cl—230 " |
| Buldana ............Do. | 3 " — 240 " | 3cl—243 " |
| Bassim ............Do. | 1 " — 100 " | 5cl—333 " |

The figures have been taken from the Hyderabad Directory for 1884.

It is clear that the lucrative posts are occupied by European and Eurasian clerks; while as a rule, the inferior posts are taken up by the native clerks. We have nothing to say against the former as a class; they may take their proper share in the offices; but what the native clerks contend for is, that government service should not be a fishy job for a select few but it should be open to all alike and that there should be some standard of merit by examination or otherwise by which promotions in English offices should be guided. If Tom is to succeed John and Richard to come after him, then this can go on at infinitum. Unless there is some definite test by which promotions are to be made the grievance cannot be satisfactorily done away with. Under an antiquated circular of the Resident the native clerks of the English offices cannot get into the revenue line and they are thus put to a double disadvantage by promotions in their own offices being blocked up on the one hand and by their unfitness to go in the revenue line, on the other. They have often the pleasure of seeing an entire out sider getting a sung Naib-Tehsildarship and themselves left to shiver in the cold. This is a state of things that ought to be remedied and we suggest that some test examination should be held every year to prove their fitness for higher clerical appointments; and a pass in this examination coupled with so many year's standing in an office should be made the standard of promotion. A regular list being made of persons who have the requsite qualifications, promotions to higher appointments in the offices should be guided by the list. The old circular forbidding the entrance into the revenue line of men from English offices, should also be annulled. As matters now stand, many young fellows who are unfortunate enough to have been engaged in the English offices, are shouldered out. This is a public grievances, as the public loses the service of many competent educated young men who ifthey are made Naib Tehsildars or the like would acquit themselves creditably at any rate far better than the best nominees of official patronage. We hope the local authorities will consider the matter and try to remove the grievance.

The political world in India is of late being enlivened by the appearance one after another of a number of political pamphlets all published in Bengal. We had some time ago the pleasure of reviewing the first two of them viz:- 'An old man's hope' and the Rising Tide. The third, "the star in the East" is perhaps the most important and learned of them all aud has elicited a series of thought ful and instructive letters from the pen of Pro: Wordsworth of Bombay. We were favoured a few days ago with a copy of the 4th, of these pamphlets which is styled. The Breaking Drawn" and is merely a reprint in a pamphlet form of an article that had on the subject, appeared some days ago in the *statesman.* Our contemporary of the Pioneer attributes the authorship of these pamphlets to Mr. A. D. Hume on what grounds we do not know. But whoever the author of these interesting publications may be they deserve an attentive perusal not only on the ground of their literary merits which are considerable but also on that of the thoughtful and moderate tone in which they are written. It is a patent fact than a country like India in which a free press and a liberal education have made so much progress both intellectual and political, cannot be governed by the methods which serve for countries where these elements are wanting. A strong Conservative Government can therefore, by no means be found adapted to a country which is making such rapid strides in civilization. On account of the prejudices and in sinuatring of an antocratic element onr present government although decidedly superior in many points to its predicissors, is still we regret to say, full of many drawbacks. To get those drawbacks removed and have reforms beneficial both to the rulers and the ruled substituted in their stead is the sole object of the loyal earnest remonstrances of these pamphlets and as such their appearance can not but be hailed with delight by those who really wish the good of tnis country. We hope our Government takes into its consideration the contents of these publications which we can safely say, embody and echo the political aspirations and views of educated natives.

The Bombay Municipality has got a very good example to other municipal bodies in contributing a sum of Rs. 5000 to the would be Technical Institute at Bombay. The sum is likely to be recovered every year. It will be remembered that the Municipality already contributes about 33000 rupees to the course of education in Bombay and our municipalities in Berar cannot do better than follow so laudable example.

NOTICE.

The undersigned intends publishing within 2 months from this date a "Manual of Civil Accounts." It will contain in the form of question and answer all the important points in the Civil account Code Vol: 1. This book will be very useful to those connected with the accounts branch more especially to those who have to pass the departmental Standard examinations. Intending subscribers will have to pay annas 10 a copy before the end of January 1887. The price after that date will be annas 12 a copy.

Apply to V. K. Desai.
Treasury clerk.
Akola, Berar.

## वऱ्हाड.

हवामान:— ह्या आठवड्यांत आकाश अगदीं मेघाच्छादित आहे, मधून मधून पावसाच्या सरीही येतात गुदस्त साल प्रमाणें या वर्षीही पिकास धक्का बसण्याचा संभव आहे.

कामठीची एक पलटण ब्रह्मदेशाकडेस स्पेशल ट्रेननें रवाना झाली व काल्हि इंगोलीची एक पलटण येथें येऊन ब्रह्मदेशाकडेस आज स्पेशल ट्रेननें रवाना होणार आहे. नशीब बिचाऱ्यांचें.

येथा सोळाव्या तारखेस कर्नल ग्रांट साहेब येथील दिपुटीकमिशनरचे जागेचा च्यार्ज घेतील व कर्नल रेनिक सा० हे रजा मागावास जाणार असें समजतें.

कमिशनरच्या आफिसांतील मि० कृष्णराव हिंगोलीकर यांना पहिल्या तारखेपासून पेनशन मिळालें.

सोळाव्या तारखेच्या सुमारास इलिचपूरची एक पलटणची तुकडी उमरावतीस येऊन तेथील इलिचपुरास जाणार.

पोंच:— येथील म्युनीसिपाल कमेटीचे सन १८८७।८८ सालचे बजेटाची एक प्रत आम्हांकडेस आली आहे तिचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों. ह्या संबंधानें काय लिहिणें तें आम्ही सवडीनुसार दऊं.

बाळापुरचे नायब तहसिलदार मि. रिहिमतूतुल्ला यांस ७९ असून रुपये ९० वर दारव्ह्यास व त्यांचे जागेवर दारव्ह्याचे नायब तहसिलदार मि. गोविंद गंगाधर दामले यास नेमणार असें समजतें.

पशूवैद्य खात्यातील वऱ्हाडांतील अधिकारी मि० कूपर यांची स्वारी वाशीम कडेस गेली आहे.

## वर्तमानसार.

नामदार लार्ड डफरीन साहेब यांनी हैद्राबादेस असतां तेथील तरुण निझाम साहेबास जो उपदेश केला तो हिंदुस्थानांतील सर्व राजांनीं लक्षांत बाळगून तदनुसार वर्तनें करण्या सारखा आहे. ते म्हणाले " हिंदुस्थानांतील सांप्रतच्या संस्थानिकाची स्थिती स्पृहणीय आहे. इंग्रज सरकारच्या कृपेनें त्यांजवर परशत्रूकडून चढाव होण्याची अगदीं भीती नाहीं. तसेंच संस्थानांत रयतेकडून बंडेही होण्याची शक्यता नाहीं; त्यांनीं आपला सर्व काळ आपल्या संस्थानची सर्व प्रकारें उन्नति करून लोकांस सुख देण्याकडे घालविता येण्यासारखा आहे. असें करण्यास त्यांनीं इंग्रज सरकारची मदत लागेल ती देण्यास सरकार तयार आहे. हिंदुस्थानच्या संस्थानिकांनीं आपल्या संस्थानांची कारभार शहाणपणानें व न्यायानें चालवून रयतेस सुखी करावें हीच इंग्रज सरकारची इच्छा आहे. " न्या. सु.

लार्ड डफरिन साहेबां सारखे नांवाजलेले अनुभवशीर मुत्सद्दी निजाम सरकार व त्यांचे दिवाण ह्यांच्यामध्यें असलेल्या बेबनावाचा कांहीं तरीं योग्य निकाल झाल्या खेरीज निघून जातील ही गोष्ट मुळींच संभवत नाहीं. एका बातमीवरून असें समजतें कीं लार्ड साहेबांनीं निजाम सरकारास सर सालरजंग ह्यास कामावरून दूर करण्या विषयीं आपलें अनुमोदन दिलें असून दिवाण साहेब आपल्या कामाचा राजीनामा देण्यास तयार आहेत, व त्यांचे जागीं अमिरिकाबीर नांवाच्या घराण्यापैकीं एका पुरुषाची नेमणूक होणार. दुसरी बातमी अशी आहे कीं दिवाण साहेबांस सर्व अपराधांची क्षमा केली जाईल; फक्त त्यांनीं दोन गोष्टीं मात्र कबूल केल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं त्यांनीं आपण नेमलेल्या अधिकाऱ्यां पैकीं कांहीं अधिकाऱ्यास एकदम रजा दिली पाहिजे; व दुसरी अशी कीं ह्यापुढें निजामसरकारचे हुकुमाबाहेर त्यांनीं काडीमात्र चालतां काम नये ह्या दोन बातम्या पैकीं कोणती बातमी खरी आहे हें खात्रीनें समजल्या खेरीज त्या संबंधानें तूर्त आह्मांस कांहींच लिहितां येत नाहीं.

निझाम साहेबांची व दुरांड साहेबांची भेट झाली. त्यांच्या गप्पा चालल्या असतां सालरजंग साहेबांची स्वारी तेथें आली. त्यांचे आगतस्वागत मोठ्या प्रेमानें झालें दुरांड साहेबांना सालरजंग यांणीं खाना दिला. अधिकार कमी झाल्यावर देखील सालरजंग सोडून जातीलच असा भरवंसा नाहीं. ने. ओ.

सर सालरजंगांनीं आपल्या दिवाणगिरीचा राजीनामा द्यावा नाहींतर त्यांस कमी करावें याबद्दल व्हाईसराय साहेबांनीं आपला रुकार दिला. अजून दिवाण कोणीच नेमला गेला नाहीं.

हैदराबादच्या दिवाणगिरीकरितां चार उमेदवार आहेत. अमीर कबीर, नवाब विकर उल उमराव, पेष्कार आणि नवाब फकीर उल्मुल्क. शिवाय बाजार गप्प अशी आहे कीं, क्राफर्ड साहेबांची ही कदाचित् या जागेवर योजना होईल.

निजामसरकारचा सर सालरजंग यांस मुख्यप्रधानकीच्या कामावर त्यांचा कांहीं अधिकार कमी करून ठेवण्याचा मानस आहे परंतु सालरजंग हे राजिनामा देतील अशी वदंता आहे. सु० प०

कोल्हापुरची राज्यव्यवस्था कौन्सिलानें चालवून दिवाणानें प्रमुखत्व स्वीकारावें असा सरकारचा ठराव झाला. रीजंट नेमण्यास योग्य मनुष्य शेवटीं सरकारला दिसलाच नाहीं की?

फ्रान्स व जर्मनीमध्यें बटाट्या पासून ब्रांडी करण्यांत येते यास्तव त्यांची अतिशय लागवड होत असते असें समजतें.

हल्लीं हिंदुस्थानांत १८ वर्षांच्या व त्या आंतील ४,००,००० विधवा आहेत. यांपैकीं एक पंचमांश ९ वर्षांपेक्षां कमी वयाच्या आहेत असें प्युरिटी ट्रूंपेट नांवाच्या पत्रावरून समजतें.

जनरल सर. रेडिवर्स बुलर यांस तूर्त आयर्लंडचे अंडर सेक्रेटरी नेमिलें.

हौस आफ कामन्सच्या प्रोसिजर मध्यें कांहीं फेरफार करण्याविषयीं विचार करण्यास्तव ता १३ जानेवारी रोजीं इंपिरियल पार्लमेंट भरणार आहे.

कलकत्यांतील रायली ब्रदर्स कंपनीला कोणी लुच्यानें खोट्या हुंड्या व मनीआरडरी दाखवून नऊ हजार रुपयाला गंडा घातला शाबासरे डावऱ्या! पु० वै०

फिन्यान्स कमेटीची मंडळी कलकत्यास आली.

चालूं माहेन्याच्या पहिल्या तारखे पासून पंजाब मिलिटरी सेक्रेटरीची जागा कमि झाली.

ग्वाल्हेरच्या हद्दींत लोकोपयोगीं कामें करण्यास सुरवात झाली.

चालूं साली एल. एल बी. च्या परिक्षेस ५४ उमेदवार होते त्या पैकीं १८ पास झालें.

अमदाबाद जिल्ह्यांत पोष्ट नेणाऱ्या जासुदास ठार मारून टपाल लुटले.

फिन्यान्स कमेटीनें आपला रिपोर्ट२० डिसेंबरच्या आंत द्यावा अशी सरकारांतून सुचना केली आहे.

ब्रह्मदेश खालसात केल्यापासून चालू वर्षास ११ लाख रुपयांची तूट येईल ह्मणतात कराण सदर ब्रह्मदेशचें उत्पन्न अवघें ६६ लाख आहे व खर्च तर ७७ इतके लाखांवर होईल.

राजपुत्र ड्युक आफ कयानाट यांची स्वारी प्रवास आटपून लौकरच मुंबईस येणार आहे.

फ्रान्सनें आपल्या सैन्याची इतकी तयारी ठेविली आहे कीं प्रसंग आला असतां एक दिवसांत त्याचे ३०,००,००० सैन्य समरांगणीं उभें राहिल असें ह्मणतात.

ता० ३०ची तार सांगतें कीं, मुंबईच्या व पुण्याच्या मुसलमान लोकांनीं आपसात समेट करण्याण्या बद्दल निजामास केलेला अर्ज निझामाच्या हातीं गेल्या वर त्यांच्या मनाची स्थिति बदलून जरी त्यांनीं व्हाईसराय साहेबांपाशीं सालरजंगास काढण्याचें कबूल केलें होतें तरी आतां सालरजंगाच्याच हाताखालीं एक असिस्टंट देऊन काम चालवावें असा निजामांचा बेत झाला आहे.

मुंबई ग्याझेट कर्ते ह्मणतात कीं, हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्यास ३९ पासून ४० रु०पर्यंत प्राप्ती आहे. आमचे ग्याझेट कर्ते स्वप्नांत तर नाहींना? असा मोघमांत मजकूर लिहून गोऱ्या अधिकाऱ्यांचीं मनें दोषित करावयाची आणि हिंदुस्थान सुखी आहे असें दाखवायाचें. असें करण्यापेक्षां हिंदु लोकांस एकदम सुळी चढवून त्यांची त्यांची संपत्ति हरण करा असें म्हणणें फार चांगलें असें आह्मांस वाटतें. इंग्रजी पत्रें नेहमीं हिंदु लोकांविरुद्ध लेख लिहितात त्यांत त्यांचा काय फायदा असेल तो त्यांचा त्यांस माहीत. असल्या खोडसाळ लेखानें व्यर्थ द्वेष मात्र वाढतो, दुसरें कांहीं नाहीं. आमच्या बंधूनीं ही घाणेरडी सवय सोडून खरा प्रकार आपल्या पत्रांतून प्रसिद्ध करण्याची वहिवाट ठेविल्यास तींच पत्रें हिंदुच्या प्रीतीस कां प्राप्त होणार नाहींत.

एक पत्रें लिहिणारा अशी सूचना करितो कीं हल्लीं दिवाणी व माजिस्ट्रेट कोर्टांतून विन परिक्षेचे वकील ( मुखत्यार ) पैशापासरी झाले आहेत. त्यांज करितां एक निराळी हलकीशी परिक्षा काढून त्यांत जो पास होईल त्याणेंच मुखत्यारपत्र घेऊन काम चालवावें. कारण तशा लोकांस कायद्याचें जसें असावें तसें ज्ञान नसल्यामुळें असीलाचें व सरकारचे फार नुकसान होते. या परीक्षेंत इतर परीक्षे प्रमाणें थोडी बहुत फी ठेवावी. असें केल्यानें कामांत चूक न होतां सरकारचा फायदा होईल. म० मि०

ग्रह फार सु० गिलोर आणि नेंद्रि- मा- वर ळे.

जमीनधारा न देण्याच्या बाबतींत ऐर्लंडांतील अयोग्य रीतीनें बंडकरणाऱ्यांवर कायद्याचा सक्त अंमल बजावण्याचे विलायत सरकारानें योजले आहे असें सांगतात.

मुंबई इलाख्यांतल्या महिकाठाप्रांतांतल्या पोळ, वारसोरा, पुनाद्रा, खंडाळ, सदानारपळ, साथंबा. विरसोडा, माजिमा, कसळपुरा, रामपुरा, सांथळ, तेजपुरा, देलोली, राणीपूर महंमदपुरा, भुलासना, तिंबा, कतरना व उमरी या २० तालुकदारांनीं आपापल्या हद्दींतील जकात माफ केल्या बद्दल हिंदुस्थान सरकारानें आपला आनंद प्रदर्शीत केला आहे. ठा० अ०

उत्तर ब्रह्मदेशांतील लोकांजवळचीं हत्यारें हिसकावून घ्यांवीं असा हुकूम निघाला आहे.

कपाशी पातीवर ( फुलास ) आल्यावर मोठ्या पहांटेस हीं फुलें विकसण्यापूर्वीं कपाशीच्या फुलांतील पुंकेसर हळूच काढून घेऊन त्या पाकळ्यांचा गाभ्यांत भेंडीच्या फुलांतील स्त्रीकेसर आणून ठेवावें नंतर हें भेसळ केलेलें गर्भफूल कपड्यांनीं बांधून टाकावें. असें बांधल्यानें त्या फुलास किडे अगर पक्षी यांचा उपद्रव लागत नाहीं. नंतर ह्या फुलांचें बोंड बनलें ह्मणजे हें बंधन सोडून टाकावें. मग ह्या बोंडास जो कापूस येईल त्याची सरकी जपून ठेवून पुढल्यासालीं तीच सरकी लावावी. याप्रमाणें त्या साहेबांनीं ह्या प्रकारच्या कपाशीचें बरेंच बी पैदा केलें ह्या कपाशीच्या रुईचा धागा सुंदर रेशमप्रमाणें मऊ व लांब असून बळकटही असतो. ने० ओ०

## नोटीस.

नोटीस बनाम मन्या वल्लद गोमा ढाल्या तेली रहाणार कोळंबी परगणें कुऱ्हड तालुके यवतमाळ जिल्हा वणी यांस नोटीस देणार रुखमा मर्द मन्या तेलीण हल्लीं रहाणार किन्हळ प्रगणें डोंगरखर्डे तालुके यवतमाळ जिल्हा वणी हिजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाले त्यास अदमास ७ वर्षें झालीं त्या नंतर मी शहाणी झाली त्यालाहि ६--७ वर्षे झालीं. तर तू मजला शहाणी झाल्यां नंतर ६ वर्षे वागाविलें त्या पुढें. आज १॥ किंवा १॥। वर्षें झालीं तूं मजला खाण्या करितां अन्नवस्त्र देत नाहींस. सबब मी मजूरी करून व कर्ज काढून आपला उदरनिर्वाह करीत आहे. यास्तव तुजला नोटीस देण्यांत येत आहे कीं तूला नोटीस पावल्या दिवसा पासून ८ दि-

नारायण गोविंदराव कडलक. नानाच्या पेठेंत घोडेपिरा जवळ घरनंबर २८४, पुणें

## विक्रीस तयार,

SAPKAR'S DIARY
FOR 1887
WITH A CALENDAR
EOR 1888.

सापकरांची रोजनिशी

## सन १८८७ साला-

तप ... त्या ... ण ...

ग बंद झाल्या म्हणजे अर्थातच ...

चें हा... नोटीस.

पाम्बचंद वल्लद सखाराम तांबटकर रहाणार पिंजर तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचे पिंजर येथें असलेलें घर मर्जीस येईल तेव्हां परत द्यावें या शरतीनें तुम्हांस रहाण्या साठीं दिलें त्यास सुमारें ८ वर्षें झालीं आतां तुम्हां कडे सदरील घर ठेवणें नाहीं सबब या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं आज पासून २० दिवसांचे आंत सदरील घर खालीं करून आमचे स्वाधीन करावें तसें न केल्यास रीती प्रमाणें तजवीज होईल. कळावें. तारीख ८।१२।८६.

( सही )
आपळाजी वल्लद नारायणजी
सोनार रहाणार पिंजर.

नोटीस

ज्यानकीदास बैरागी राहणार असलगांव तालुके जळगांव जिल्हे खानदेश. यास नोटीस देणार बिरदीचंद सितायाम मारवाडी राहणार असलगांव याजकडून नोटीशीनें असें कळविलें जाते कीं अदमासे अडीच महिने जाहले गंगाबिसन मारवाडी याचा भाऊ भीजे वडोदे येथें मांदा असल्याकारणानें गंगाबिसन यांजकरितां मी तुमचे जवळ घोडे मागून घेऊन पुन्हा तेच दिवशीं संध्याकाळीं तुमचें घोडे परत आणून तुमचे घरी पोचविले असतां तुम्ही घोडे घेत नाहीं म्हणून जबाब दिल्यावर तुम्हांस मी समक्ष पुष्कळवेळां सांगितलें कीं घोडे घेऊन जावें तरी तुम्ही नेत नाहीं. व विनाकारण त्या घोड्याचे खावटीचा खर्च उगीच बसत आहे. याजकारितां या नोटिशीनें कळवितों कीं नोटीस पावताच आपले घोडें घेऊन जावें. या प्रमाणें करण्यास चुकल्यास तुमचेवर, नुकसानी बद्दल दावा करून सर्व रकम भरून घेऊं घोड्यास रोज चार आणे खर्च लागत आहे. त्याप्रमाणें पाच महिन्याचे रूपये ३८ खावटी जाहली ती भरून घेऊं. घोडे मेल्यास अगर घटल्यास त्याची जबाबदारी आम्हावर बिलकुल नाहीं. म्हणून नोटीस दिली. तारीख ८ माहे दिसेंबर सन १८८६ इसवी.

सही बिरदीचंद सितायाम मारवाडी
दुकान असलगांव.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छा० प्र० केलें.

वर्षाची आगाऊ रु० ६ टांकहशील
सहामाही " ३ " "
साल अखेर " ७ " "
किरकोळ अंकास...............

Per annum in arrears 7 " 1R. 8 as
Six monthly............ 3 " 8 as
Single copy............................ 4 as



नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०१

Advertisements.
Below 10 lines...2as
Per line over 10...4as
Repetition per line 3as


# वऱ्हाडसमाचार.


THE BERAR SAMACHAR.

VOL XX

पुस्तक २०

MONDAY 20 DECEMBER 1886 NO 49

सोमवार तारीख २० माहे दिसेंबर सन १८८६ इ० ४९


## वेदांतग्रंथ.

संस्कृत टीका व मराठी अर्थ व स-
मजुतीच्या टिपा ह्यासहित,
रा० रा० व्यंकटराव रामचं[द्र]
ह्यानीं तयार केलेले. किं.

इशोपनिषत् .... ..........
केनोपनिषत् ............
...............०८—०१
...षत्,(अध्याय१) ...०१२—०१
...निषत्,(अध्याय२)....०१२—०१
...निषत्,[भृगुवल्ली]....०८—०१
...ोपनिषत् ,(ब्रह्मानंदवल्ली)तयार होत
छांदोग्योपनिषत् , ( प्रपाठक ६ )
...पीत आहों. योगसुत्रें, [ समाधिपाद ]
छापीत आहों.

हे ग्रंथ ज्ञानचक्षु छापखान्यांत फक्त ब्राम्हणांना विकत मिळतील.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचे मालक.

...o ...xa-
...ka Intending subscribers ... pay annas 10 a copy be-... ...nd of January 1887. The price after that date will be annas 12 a copy.

Apply to V. K. Desia.
Treasury clerk.
Akola Berar.

## नोटिस.

**मुलुक अमानीं हैद्राबाद यांतील अपकारी मक्त्याच्या (दारू, ताडी, अफू गांज्या) विक्रीच्या तारखा सन १८८७-८८ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत.**

**प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्ट गृहांत १२ वाजतां होईल:**

अमरावती—सोमवार १७ जानेवारी सन १८८७

एलिचपूर—सोमवार २४ जानेवारी सन १८८७.

आकोला—सोमवार ३१ जानेवारी सन १८८७.

बुलडाणा—मंगळवार ८ फब्रुवारी सन १८८०

वाशिम—शुक्रवार १८ फेब्रुवारी सन १८८७

वणी—( यवतमाळ ) सोमवार २८ फेब्रुवारी सन १८८७.

मक्त्याच्या व हरासाच्या शर्तीचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे आफिसांत मिळू शकेल.

L. S. Saunders. Commissioner
H. A. D.

## वेदांतग्रंथ.

संस्कृत टीका व मराठी अर्थ व स-
मजुतीच्या टिपा ह्या सहीत,
रा० रा० व्यंकटराव रामचंद्र
ह्यानीं तयार केलेले. किं. ट. ख.
इशोपनिषत् .... ...........०८—०१

## ज्योतिष्प्रकाश

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, आम्ही सन १८८६ च्या जानेवारी महिन्याच्या १ल्या तारखेपासून ज्योतिष्यप्रकाश या नांवाचें मासिक पुस्तक काढींत आहोंत. ह्यामध्यें पत्रिका, वर्षफलें, मासफलें, दिन फलें, प्रश्न संबंधी फलें, रमलशास्त्र; स्वरशास्त्र, केरलशास्त्र पंचपक्षी, सुर्यसिद्धांता दिसिद्धांत, लीलावती, बीज, आणि विश्वकर्मोज्यादि सकल मुहूर्तनिष्काशनप्रकार, इत्यादि संपूर्ण ज्योतिषशास्त्रीय विषयांची अति सुलभ रीतीनें माहिती क्रमाक्रमानें दिली जात आहे. आणि इंग्रजी रीतीनें प्रत्येक महिन्यांतील प्रति दिवसाचे स्पष्ट ग्रह दिले जातात.

या पुस्तकाची किंमत सालाचे ३ रु० व टपाल खर्चाबद्दल ६ आणे एकूण ३ रु. ६ आणे व मागाहून ४ रु. ८ आणे ठेवली आहे.

किरकोळ अंकास किंमत ६ आणे पडेल

वर्गणीचे पैसे मनीआरडर करून पाठवावेत, तिकिटें पाठविणें झाल्यास वर्तावळ्या सहित पाठवावीत.

वर्गणी अगाऊ आल्याखेरीज पुस्तक पाठविलें जाणार नाहीं.

वर्गणी आमच्या नांवें पाठवावी.

तारिख १३ नोवेंबर सन १८८६

नारायण गोविंदराव कढळक.
नानाच्या पेठेंत घोडेपिरा जवळ
घरनंबर २८४, पुणें.

## नोटीस

बनाम विनायकराव विष्णु पेसरी मुक्काम लष्कर तालुका इलिचपूर यांस सुकुसिंग वल्लद बाबुसिंग जात लहरिये राहणार इलिचपूर याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तूं आमचे रुपये २०० शिक्के सरकारी शिवाय व्याज खातेंवर टिकिट लावून सही केली आहे. त्यास आज २ दोन वर्षें झालीं अद्याप रुपयाची आदाई केली नाहीं. तुम्हांस आदाई करण्याबद्दल टपालांतून दोन तीन नोटीसा पाठविल्या परंतु आपण त्याचा कांहीं विचार न करितां रुपयांची अदाई केली नाहीं यान करितां तुम्हांस वर्तमानपत्रांतून असें कळवितों कीं आमचे रुपये देऊन पावती घ्यावी असें न केल्यास नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत वर लिहिलेलें व्याज व मुद्दल आणून देऊन पावती घ्यावी. असें न केल्यास नोटीशीचा खर्च व कोर्ट खर्चासुद्धां रक्कम भरून घेतली जाईल. कळावें. तारीख १६-१२-८६

सही सुकुसिंग वल्लद बाबुसिंग जात
लहरिये दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य १० शके १८०८

## विद्याखात्या संबंधानें फिन्यान्सकमिटीच्या सूचना.

( मागील अंकावरून पुढें चालूं )

पूर्वीं जेव्हां हिंदुस्थानांत शिक्षण क्रमाची सुरवात झाली त्या वेळीं याचे उत्पादकांचें मनांत फार स्तुत्य हेतु असावेत असें मानलें असतां ते हेतु सरकारी शाळा आज काढून टाकल्यास कितपत सिद्धीस गेल्या सारखे होतील याची कल्पना करणें फार कठीण आहे असें नाहीं. सुमारें वीस कोट प्रजे पैकीं तीन कोटी प्रजेला विद्या मिळणें म्हणजे विद्येचा प्रसार लागतो आहे हें उघड आहे. प्रजेस शिक्षण देण्याचें काम राज्यकर्त्यांचे कर्तव्यां पैकीं एक मोठे जबाबदारीचें कर्तव्य आहे असें मानिलें आहे. ही जोखीम सरकारानीं आपलें शिरावर घेऊन या देशांत काय खटपट केली याची कल्पना करण्यास हिंदुस्थानांत दर मुला गणीक शिक्षणा संबंधानें सरासरी खर्च किती होतो हें पाहिलें म्हणजे झालें. हिंदुस्थानांत एका मुलाचें शिक्षणा संबंधानें सरासरी खर्च सरकारास सुमारें बारा आणे आहे। विलायतेंत एका मुला बद्दल सरकारास खर्च सुमारें दोन पौंड म्हणजे वीस रुपये आहे इतका खर्च हिंदुस्थानांत कमी असतांना त्यांतून कमी करण्याचा विचार करणें कितो निंद्य आहे. इंग्रज लोकांनीं या देशांत येऊन राज्य करण्याचा हेतु वारंवार बोलून दाखविला आहे कीं केवळ तुम्हांस आपलें स्वराज्य करण्या पुरती अक्कल यावी असें शिक्षण तुम्हांस देण्या करितां ईश्वरानें आमच्या राज्याची या देशावर योजना केली आहे ही गोष्ट खरी असल्यास हल्लींच्या सूचना आजपर्यंतच्या बोलण्याशीं फार विरुद्ध दिसतात. सरकारी शाळेंत धर्म संबंधानें बिलकूल चर्चा करावयाची नाहीं व कोणतेही धर्मांत हात घालावयाचा नाहीं हा जो सरकारचा इरादा तोही नाहींसा होईल; म्हणजे सरकारी शाळा नाहींशा झाल्यानें, व पाद्री लोकांच्या शाळा स्थापन झाल्यानें प्रत्यक्ष रीतीनें जरी सरकारनें धर्मांत हात घातला नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें घातला अशाविषयीं शंका उत्पन्न होण्यास कारण होणार आहे; व सरकारचें औदासिन्यही तितपतच आहे असा लोकांचा ग्रह होईल. आतां ह्या सूचना कदाचितूं वऱ्हाडास लागूं होतील कदाचित् लागू होणार नाहींत. परंतु लागू होण्याची भीति आहे. मुंबई इलाखा किंवा मद्रास व कलकत्ता इलाखा येथील शाळांपेक्षां वऱ्हाडांतील शाळा अद्याप फारच कमी आहेत, ह्मणजे विद्येचा प्रसार फारच थोडा झाला आहे व लोकांस विद्येची गोडी लागावी त्याच्या सहस्रांशही गोडी अद्याप लागली नाहीं. मुंबई इलाख्याचे कित्येक भागांपेक्षां वऱ्हाडांत विद्येचा उपयोग जास्ती होणार आहे कारण येथील कुणबी लोकांची स्थिती बरी असल्यामुळें त्यांस शाळेंतून शिक्षण मिळाल्यास धंदाशिक्षण मिळविण्यास त्यास फार कठीण नाहीं. पोट भरण्याची वऱ्हाडांतील कुणब्यांस दक्षिणेतील कुणब्यां इतकी मारामार नाहीं. व या मुळेंच येथील लोकांस शाळेंतील विद्या प्राप्त करून घेऊन धंदा वगैरे शिकण्याम सामग्री आहे. अशा ठिकाणीं शाळा वाढविल्या पाहिजेत व जितका प्रसार विद्येचा करवेल तितका केला पाहिजे. अशा स्थितींत जर सरकारनें शाळा खात्यांतून आपलें अंग काढून घेतल्या सारखें केलें तर मात्र त्यांचे माथीं मोठाच दोष येणार आहे. अर्थात ह्या गोष्टी अजून अवकाशाच्या आहेत तरी त्या इतक्या महत्वाच्या आहेत कीं त्यांचा आज विचार करणें रास्त आहे.

फिन्यास कमिटीच्या सूचना विद्या खात्यावर गदा आणण्या सारख्या आहेत असें आम्हीं वर सांगितलें आहेच. बहुत करून असा प्रसंग नयावा व येऊं नये असा असा अजमास कित्येक लोक करितात परंतु सरकारास आज खर्च तर जास्ती लागत आहे, व उत्पन्न कमी या मुळें कदाचित शाळा खात्यावर धाड येईल कीं काय अशी फारच भीति वाटते. पुणे येथील डेक्कन कॉलेज नांवची पाठशाळा मोडून टाकावी अशा विषयी कमिटीची सुचना असल्या बद्दल बूट बाहेर पडून बरेंच दिवस झाले,

त्याप्रमाणेच ठीक ठिकाणी मुंबई ईलाख्यात जीं हायस्कुलें आहेत तींहि होतील तितकी कमी करावी व अशा रीतीनें खर्च कमी करावा अशा विषयीं हीकोमेटीची सुचना असल्याचे पूर्वी कळविलेच आहे. काटेवाडात लार्डरे साहेबानी भाषण केलें त्यावरून असें वाटतें कीं बहुकतेकांचा डेक्कन कालेजाशी संबंध जास्त आहे म्हणजे आमचे एथील विद्यार्थी कांहीं मुंबईस ही जातात तथापि पुणें येथील विद्यालयात बरेंच जातात. डेक्कन कालेज नाहींसें झाल्यानें जें नुकसान होणार आहे तें आमचेंच नुकसान असें म्हटल्यास हरकत नाहीं. आतां कदाचीत ती पाठशाळा मोडली तर 'नदुःखंबहुभिःसह' या म्हणी प्रमाणें चुरमुरे खात बसावे लागेल हे खरें; तथापि डेक्कन कालेज मोडल्यानें वऱ्हाडातील विद्यार्थ्यांस ही फार त्रास होईल.

---

यंदाच्या न्याशनल कान्फरसला कलकत्ता येथें चालुं महिन्याच्या २७ विला सुरवात होऊन तारीख २८ व २९ हे दोन दिवस तें भरेल. या बड्या समाजाला आपापल्या तर्फेनें पाठविण्याचे प्रतिनिधी निवडून काढण्याकारितां मोठमोठ्या शहरीं व इतर ठिकाठिकाणीं सभा भरत आहेत. मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोशियननें आपल्या तर्फेने कॉंग्रेसला जाण्याकारितां आनरेबल दादाभाई नवरोजी, तेलंग मंडलिक, याज्ञिक वगैरे मोठमोठ्या गृहस्थांची निवड केली आहे, व त्याप्रमाणें पुणें वगैरे शहरींही प्रतिनिधी निवडले जात आहेत. सदरहु समाजांत हिंदुस्थान संबंधांच्याच गोष्टींचा विचार व्हावयाचा आहे व त्याप्रमाणें प्रत्येक इलाखा आणि प्रत्येक प्रांत यांतून कोणीतरी निवडलेले गृहस्थ आप आपल्या प्रांतासंबंधानें व एकंदर हिंदु राष्ट्रांचे संबंधानें गोष्टींचा उहापोह करण्याकारितां जावे हें रास्त आहे. इतर ठिकाठिकाणाहून जसे योग्य रीतीनें निवडलेले गृहस्थ जातात त्याचप्रमाणें यंदा आमच्या वऱ्हाडांतूनही कांहीं गृहस्थांनीं जावें असें आम्हांस वाटतें. दिवसें दिवस या लहानशा प्रांताची प्रत्येक गोष्टीनें सुधारणा होत चालली आहे व लोकोपयोगाच्या नवीन नवीन गोष्टी यांत सुरू होत आहेत. त्याप्रमाणें आमच्या इकडील लोकांनीं या राष्ट्रीय समाजाचा हा उपयोग करून घ्यावा. आमच्या प्रांतांत या समाजाला शोभणारे असे गृहस्थ नाहींत असेंही नाहीं. इतर प्रांतीं ज्या ज्या हितावह गोष्टी होतात त्यांचें अनुकरण बहुधा आमचे इकडे होत असते व या गोष्टींतही आमच्या इकडील विद्वान गृहस्थांनीं इतर प्रांताचें अनुकरण केलें असतां हितावह होणार आहे. या गोष्टीचा विचार आमचे अकोला व उमरावती येथील पुढारी म्हणविणारे सुशिक्षित गृहस्थ करतील अशी आम्ही आशा करतों.

---

वरील समाजांत ज्या विषयांचा विचार व्हावयाचा आहे ते हिंदुस्थानच्या सांप्रत स्थितीला अनुसरूनच असतील यांत संशय नाहीं; तथापि त्यांतही हल्लीं लोक समाजांतून चालूं असलेल्या बड्या बड्या विषयांबरोबर इतर कांहीं बारीक बारीक विषयांचाही विचार केला असता बरें होईल. कचेरी खात्याचा खर्च कमी करणें, पार्लमेंटमध्यें आपल्या तर्फेनें सभासद घेणें, इंडिया कौन्सिल सुधारणा करणें इत्यादि बड्या गोष्टी हिंदुस्थानला हितावह आहेत खऱ्या परंतु त्याशिवाय अशा कांहीं गोष्टी आहेत ज्या हल्लींच्या सरकारच्या कारकीर्दींत आहेत कीं त्यांत सुधारणा अगोदरच झाली पाहिजे. उदाहरणार्थ दिवाणी व फौजदारी खटल्यांची चौकशी करण्याकारिता नेमिलेले न्यायाधीश घ्या. कित्येकवेळा असें घडून येतें कीं एखाद्या खटल्यांत शाहण्या आणि अनुभविक एत्तद्देशीय न्यायाधिशानें केलेला न्याय ज्याला अनुभव मुळींच नाहीं व इकडील लोकरीतीची ज्याला माहिती नाहीं अशा इंग्रजी न्यायाधिशाला तो बदलावडून तें यांच्या आगदीं उलट न्याय करितो. त्याचप्रमाणें फौजदारी खटल्याची अवस्था. यासंबंधानें तर कित्येक ठिकाणचे लोक केवळ गुलामाप्रमाणें होऊन राहिले आहेत. तेव्हां अशा गोष्टींचाही विचार व्हावा असें आम्हांस वाटतें. केवळ मोठमोठ्या राजकीय आणि गहन प्रकरणांतच आमच्या बड्या मंडळींनीं गढून जाऊं नये.

---

आम्हांस लिहिण्यास आनंद वाटत आहे कीं आनरेबल मि० इलबर्ट यांचे जागीं आलेले व्हाईसराय साहेबांच्या कायदे कौन्सिलचे मेंबर ऑनरेबल मि० स्कोबल हे हिंदुस्थानातील तुरुंगांचे सुधारणेकडे आपलें लक्ष्य लावणार आहेत. या देशांतील तुरुंगांत हल्लीं किती अव्यवस्था आहे व बेपरवा चालूं आहे हें सांगणें नकोच. फार कशाला आपल्या सरकारचे राज्यांत दुर्दैवेंकरून दोषास्पद ज्या कांहीं गोष्टी राहिल्या आहेत त्यापैकींच ही एक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या महत्वाच्या गोष्टीकडे मि० स्कोबल हे आपलें लक्ष्य लावणार आहेत ही मोठी आनंदाची गोष्ट समजावयाची. मि० स्कोबल यांना या कृत्यांत यश येऊन त्यांनीं इच्छिल्याप्रमाणे कांहीं सुधारणा झाली तर कारागृहांत वर्षांवर्षें कुजत पडलेले लाखो प्राणी जन्मभर त्यांना दुवा देतील. परमेश्वर करो आणि मि० स्कोबल यांना या सुकृत्यांत चांगलें यश येवो.

---

आज कित्येक वर्षें पब्लिक सर्व्हिस मध्यें एत्तद्देशीय लोकांना चांगल्या जागा मिळत नाहींत स्टाटुटरी सिव्हिलियन निवडण्याची रीत पुरती नाहीं वगैरे पुष्कळ तऱ्हेनें आपल्या लोकांची ओरड चालली होती परंतु लार्ड डफरिन साहेबांनीं पब्लिक सर्व्हिस प्रश्नाचा विचार करण्या साठीं एका कमिशनची नेमणूक केल्यापासून आपल्या लोकांना बऱ्याच आशा उत्पन्न झाल्या आहेत. ह्यांत कमिशन मध्ये ज्या गृहस्थांची निवड केली आहे त्या पैकीं बहुतेक न्यायी व पापभीरु असल्या कारणानें व त्यांत विशेषतः मुख्य प्रेसिडेंट आपल्या कळकळीचे नेमिले गेल्या कारणानें आपल्या लोकांना बराच धीर आला आहे. सदर कमिशनचा तारीख १५ रोजीं लाहोर मुक्कामीं आरंभ झाला त्याजजागी साक्षी दार यांजकडून माहिती देणारे लोकांची व इतर मंडळांची वगैरे पत्रांतें वगैरे लोकांची ज्या ज्या विषयां संबंधानें माहिती घ्यावयाची त्याचे प्रश्न प्रेसिडेंट साहेबांनीं सर्वांकडे लावून आहेत. हे प्रश्न खरोखर फार उत्तम त्यांच्या योगानें पब्लिक सर्व्हिस संबंधानें खरी अशी बरीच माहिती सरकारास येणार आहे. वरील प्रश्न सर चार्लस विलसन साहेबांनीं फार काळजीनें तयार केले आहेत व ते खालीं लिहिलेल्या मुद्यावर आहेत. (१) हल्लींच्या स्टाटुटरी सिव्हिलियन सिस्टीमची स्थिती.

[२] हल्लींच्या स्टाटुटरी सिव्हिलियन लोकांची निवड [३] हिंदुस्थानातील सिव्हिलसर्व्हिसच्या नोकऱ्यासाठीं इंग्लंडांत होणारी निवड [४] त्याच संबंधाची हिंदुस्थानांत होणारी निवड. [५] अनकॉव्हिनेंटेड लोकांची बढती (६) इंग्लंडांत परिक्षा न देतां नेमलेल्या हिंदुस्थानांतील कॉव्हिनेंटेड सिव्हिलसर्व्हिस लोकांना पगार, रजा, पेनशन वगैरेची माहिती आणि (७) या शिवाय साधारण माहिती. या प्रत्येक मुद्यावरील आम्ही आपलें विचार सवडीनुसार प्रगट करणार आहों. आतां फक्त एवढेंच सांगणें आहे कीं ज्या ज्या गृहस्थांना म्हणून साक्षीदार यांनात्यानें माहिती देण्या विषयीं बोलावणें येईल त्यांनीं आपलें कर्तव्यकर्म खऱ्या रीतीनें बजवावें कारण त्यावर पुढील सर्व अवलंबून आहे.

क्र ग्रह वे फार ०सू० इंग्लोर आणि निद्रि- मा- वर ले.

---

मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेला हायस्कुलांतून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना आज पावेतों आपल्या हेड मास्तरांच्या किंवा प्रिन्सिपालच्या परवानगी शिवाय जात येत नसे परंतु गेल्या आठवड्यात आनरेबल राव साहेब मंडलीक यांच्या सूचनेवरून ही अट काढुन आतां पाहिजे त्याला आपल्या हेड मास्तरच्या परवानगी शिवाय या परीक्षेला जाण्याची परवानगी मिळाली आहे. या रीतीनें मॅट्रीक्युलेशनला जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुष्कळ वाढून त्यांत गचाळ मंडळी ही बरीच भरण्याचा संभव आहे खरा तथापि या नियमानें खालच्या वर्गांतील कांहीं हुशार मुलांना ही प्रयत्न करून पाहण्याची संधी मिळणार आहे. त्याप्रमाणें वरील परीक्षेला फी व अर्ज २ महिनें अगोदर पाठवावा लागत असे तो वरील गृहस्थांच्या सुचनेवरून फक्त १ महिना अगोदर पाठविला पाहिजे असें ठरलें आहे. हा नियमही पुष्कळ सोईकर होईल यांत संशय नाहीं.

---

# The Berar Samachar

MONDAY 20 DECEMBER 1886

---

By far the most important event of the day is the appointment of the public Service Commission which began its sittings at Lahore from the 15th, Instant. The principal object of the Commission is to enquire into the question of admission of the Natives of India to the Indian Civil ... men ... called ... a very i... and that m... depends upon ... dence they give.

---

These questions have in the mean while furnished a very palatable and wholesome food for our ensuing National Congress and its members will not do anything better than discuss them in their sittigs and forward their minute on them to the President of the Pubilc Service Commission as requested.

## LORD REAY ON ENGLISH EDUCATION.

His Excellency the Governor of Bombay made an instructive and nteresting speech at the distribution of prize at the Rajamur College on the importance of English education and its effect upon native mind. We cut the following for the benefit of our readers.

After distributing the prizes, H. E. the Gevernor said :--

Your Highnesses, Thkore Sahebs Colonel Wodehouse, Mr. Macnaghten, Ladies and Gentlemen, and Boys of this Collage,-- I shall not easily forget the brilliant scene of this day. It realises one of my ardent wishes to pay a visit to the Rajkumar College. Amidst the brilliancy of the scene I cannot forget its gravity. We are here brought face to face with one of the greatest problems which it is given to Indian administrator and to the English and Indian educationalist to solve. That was felt long ago, and by a fortunate accident my first visit coincides with what may be, though I hope it will not be, the last visit of General Keatinge who first conceived the idea of starting this noble institution ( cheers. ) It is, alas ! too easy to reproduce in another civilization the lower forms of the civilization which comes in contact with it, but it is an extremely difficult task difficult as it is noble --- to introduce into a country of which the destinies are confided to you by the Almighty what is best and what is noblest in your own civilization. That is the task which has been undertaken by the Committee, by the Princes and Chiefs who have started this Institution. They felt that their own ancient traditions could not be improved by borrowing from English civilization what is best. Now I have no hesitation in saying that what in England is still cherished by all classes of the people is the character of an English gentleman. I believe it to be Mr. Macnaghtan's aim --- to give you some of the best cha

नारायण गोविंदराव कडलक.
नानाच्या पेठेंत घोडेपिरा जवळ
घरनंबर २८४, पुणें

विक्रीस तयार,
SAPKAR'S DIARY
FOR 1887
WITH A CALENDAR
EOR 1888.
सापकरांची रोजनिशी
सन १८८७ साला-
तप ...
...श बंद झाल्या म्हणने अर्थातच ...
...र्चे ... नोटीस.

पानाचंद बल्द सखाराम तांबटकर
राहाणार पिंजर तालुके अकोलें यांस
...र्जी सही करणार याजकडून नोटीस
...येतें कीं आमचे पिंजर येथें ...
मर्जीस येईल ... परत ...
साठीं